रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १७ ◆ अंक १९६
www.ramprahar.com

# राम प्रहर

शनिवार, १ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

संजय गांधी उद्यानात आता बिबट्याची सफारी/२

'पेण अर्बन बँक ठेवीदारांच्या हक्कासाठी प्रयत्न करणार'/५

ट्रायथलॉन स्पर्धेत महाराष्ट्राला विजेतेपद/८

## प्रवीण दरेकरांच्या 'त्या' मागणीवरून एसआयटी स्थापन

**मुंबई :** राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर महाविकास आघाडीचे सरकार असताना खोटे गुन्हे दाखल करून अडकविण्याचा कट रचल्याचे षडयंत्र आखले गेले होते, असा आरोप भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी केला होता. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही दरेकर यांनी डिसेंबर महिन्यात नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात पेन ड्राईव्ह सादर करून केली होती. आता या मागणीच्या आधारावर महायुती सरकारने संबंधित प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटी स्थापन केली आहे. कायदा व सुव्यवस्थेचे पोलीस सहआयुक्त सत्यनारायण चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील तीन अधिकाऱ्यांचे विशेष तपास पथक या प्रकरणाची चौकशी करेल. तपास पथकाला अहवाल सादर करण्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

# आज सादर होणार केंद्रीय अर्थसंकल्प; देशवासीयांचे लक्ष

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन १ फेब्रुवारी रोजी देशाचा सर्वसाधारण अर्थसंकल्प सादर करणार आहेत. मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील हा दुसरा अर्थसंकल्प आहे. दरम्यान, अर्थमंत्र्यांनी शुक्रवारी (दि. ३१) लोकसभेत आर्थिक वर्ष २०२४-२५ चा आर्थिक पाहणी अहवाल सादर केला. या अहवालानुसार आर्थिक वर्ष २०२५-२६साठी सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढीचा दर हा ६.३ ते ६.८ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन संसदेत २०२५चा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. त्यांचे हे आठवे अर्थसंकल्पीय भाषण असेल. लोकसभेत सकाळी ११ वाजता अर्थसंकल्पीय भाषण सुरू होईल. त्या काय घोषणा करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जीडीपी ६.३ ते ६.८ टक्के राहण्याचा अंदाज




> **आज बजेट सत्राच्या प्रारंभी मी समृद्धीची देवी लक्ष्मीमातेला नमन करतो. आपल्या संस्कृतीत अशा वेळी लक्ष्मीमातेचे स्मरण करणे ही जुनी परंपरा आहे. मी लक्ष्मीमातेकडे प्रार्थना करतो की, देशातील गरीब व मध्यमवर्गावर तिची कृपादृष्टी राहो. या बजेटमध्ये विकसित भारताचा चेहरा दिसेल. यासाठी सरकार मिशन मोडवर काम करीत आहे.**
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

दरम्यान, संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संयुक्त सभागृहासमोर अभिभाषण केले. ४९ मिनिटांच्या भाषणात राष्ट्रपती मुर्मू यांनी सरकारच्या यशाबद्दल आणि योजनांची रूपरेषेबद्दल माहिती दिली. राष्ट्रपतींच्या भाषणानंतर काँग्रेस नेत्या आणि पक्षाच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांनी मात्र बिचाऱ्या राष्ट्रपती, त्या खूप थकलेल्या दिसत होत्या, अशी प्रतिक्रिया दिली. या वक्तव्यावर राष्ट्रपती भवनातून प्रतिक्रिया देण्यात आली आहे.

तासभर चाललेल्या भाषणादरम्यान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू कुठेही थकल्या नव्हत्या. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर काँग्रेस पक्षाच्या काही नेत्यांच्या टिप्पण्यांमुळे एका उच्चपदस्थांच्या प्रतिष्ठेला धक्का बसला आहे. अशा टिप्पण्या दुर्दैवी असून पूर्णपणे टाळता येण्यासारख्या आहेत, असे राष्ट्रपती भवनने म्हटले आहे.

# मराठी भाषेला एआयची जोड द्यावी

- **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली संकल्पना**
- **विश्व मराठी संमेलनाचे शानदार उद्घाटन**

**पुणे : प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागातर्फे पुण्यात ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत तिसरे विश्व मराठी संमेलन होत आहे. या संमेलनाचे उद्घाटन शुक्रवारी (दि. ३१) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपस्थितांना संबोधित करत असताना त्यांनी मराठी भाषेला कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) जोड देण्याची संकल्पना मांडली.

उद्घाटन समारंभास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, मंत्री उदय सामंत, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, आमदार भिमराव तापकीर, अप्पर मुख्य सचिव आदी उपस्थित होते.



या वेळी ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांना त्यांच्या मराठी साहित्यातील अमूल्य योगदानासाठी साहित्य भूषण पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. अभिजात पाठपुरावा समितीच्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. याशिवाय राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या संकेतस्थळाच्या मराठी आवृत्तीचे लोकार्पण या सोहळ्यात करण्यात आले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे हे पहिले विश्व मराठी संमेलन असून अभिजात मराठी हीच या संमेलनाची संकल्पना आहे. मराठी साहित्य स्मॉल लँग्वेज मॉड्यूलमध्ये टाकल्यास येणाऱ्या पिढ्यांना मराठी साहित्यिकांचे साहित्य वाचण्यास मिळेल. पूर्वी संकेतस्थळ तयार केले जायचे. आता संकेतस्थळाचे युग मागे पडले असून कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग सुरू झाले आहे. या अभिनव संकल्पनेची सुरुवात राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागाने करावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचित केले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, भाषा ही केवळ संपर्काचे साधन नाही, तर अभिव्यक्तीच्या माध्यमातून सृजन निर्मितीचेदेखील साधन आहे. मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा राजमान्यता प्राप्त आहे, परंतु मराठीला राजमान्यता देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले.

मराठी भाषा प्रत्येक किलोमीटरवर बदलत असली तरी तिची गोडी अवीट आहे. मराठीतील बोलीभाषा आणि तिच्यातील साहित्य, काव्यप्रकार हे अतिशय वेगळे आणि मनाला भावणारे आहेत. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर पहिल्यांदाच दिल्ली येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित होणार आहे, ज्याचा अत्यंत आनंद आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. या वेळी संमेलनाच्या विविध स्टॉल्सवर त्यांनी भेट दिली.



# एकही झोपडीधारक बेघर होणार नाही; आम्ही तुमच्या ठामपणे पाठीशी!

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून दिलासा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल एसटी बसस्थानक ते रेल्वे स्टेशन परिसरातील झोपडपट्टी परिसरात विकास आराखड्यामुळे निर्माण झालेल्या संभ्रमाबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्पष्टता दिली आणि झोपडीधारकांना दिशाभूल करणाऱ्यांपासून सावध राहण्याचा सल्ला दिला. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत सर्वेक्षण सुरू असल्यामुळे पुनर्वसन निश्चित होईल आणि एकही झोपडीधारक बेघर होणार नाही, असे त्यांनी आश्वासित करून झोपडपट्टीवासीयांना मोठा दिलासा दिला आहे.

विकास आराखडा आणि त्या अनुषंगाने शिवाजीनगर, मालधक्का, पंचशील नगर, नवनाथ नगर या झोपडीधारकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न समाजकंटकांकडून केला जात आहे. त्यामुळे येथील झोपडीधारकांनी आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन या विषयावर योग्य मार्ग काढण्याची मागणी केली. त्यानुसार ही बैठक मार्केट यार्ड येथे पार पडली. या बैठकीस पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, उपाध्यक्ष जयंत पगडे, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका सुशीला घरत, वृषाली वाघमारे तसेच मच्छिंद्र झगडे, अशोक आंबेकर, सामाजिक कार्यकर्त्या



जरीना शेख, रावसाहेब खरात, राहुल वाहुळकर, संजय जाधव, चंद्रकांत मंजुळे व्यासपीठावर उपस्थित होते. बैठकीस झोपडीधारक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना सांगितले की, झोपडीधारकांनी दिशाभूल व फसवणूक करणाऱ्यांपासून सावध रहावे. पनवेलमधील शिवाजीनगर, मालधक्का, पंचशील नगर, नवनाथ नगर आदी झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून होणार असून सर्व झोपडीधारकांना पक्की घरी देण्यात येणार आहेत. पनवेल महापालिका अंतर्गत येणाऱ्या या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन सरकारच्या माध्यमातून करण्याची जबाबदारी पनवेल महापालिकेची असून या झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनसाठी पंतप्रधान आवास योजनेंतर्गत सर्वेक्षणदेखील सुरू आहे. ज्या ज्या ठिकाणी पाठपुरावा करावा लागेल त्या ठिकाणी आम्ही पाठपुरावा करू, असे सांगून कोणताही झोपडीधारक बेघर होणार नाही याची काळजी घेऊ, त्यांना परवडेल अशी घरे शासनाच्या नियमातून व माध्यमातून देऊ, असे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिले.

झोपडपट्टी पुनर्वसन प्रक्रियेच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू असताना फॉर्म भरण्यासाठी काही लोकांकडून झोपडीधारकांकडून पैसे मागितले जात आहेत. त्यामुळे गरीब माणसाकडून का पैसे घेता, असा सवालही त्यांनी उपस्थित करून झोपडपट्टीवासीयांची दिशाभूल करणाऱ्यांचा खरपूस समाचारही घेतला. झोपडपट्टीवासीयांना चांगली आणि पक्की घरे मिळाली पाहिजेत हा आमचा कायम आग्रह राहिला आहे आणि त्यानुसार तशी मागणी व पाठपुरावा आम्ही केला आहे. प्रत्येक झोपडपट्टीवासीयाला घर मिळाले पाहिजे यासाठी पनवेल महापालिकेची जबाबदारी आहे. व्यासपीठावरील भाजपचे आम्ही सर्व सक्षम आहोत आणि तशी जबाबदारी आम्ही घेतलेली आहे, असे सांगतानाच फसवणूक करणाऱ्यांपासून सावध रहा, असे आवाहनही आमदार प्रशांत ठाकूर यांनी करत फसवणूक करणाऱ्याला आम्ही भाजपमध्ये घेणार नाही, असेही अधोरेखित केले. (पान २ वर..)

## निवडक

### बेपत्ता शिवसेना नेते अशोक धोडी यांचा मृतदेह सापडला

**भिलाड :** पालघरमधून बेपत्ता झालेले शिवसेनेचे पदाधिकारी अशोक धोडी यांचा मृतदेह तलावात सापडलेल्या त्यांच्या कारच्या डिक्कीत आढळला आहे. धोडी यांची कार गुजरातमधील भिलाडजवळील सरिग्राम मालाफलिया येथे एका बंद दगडखाणीत सापडली. धोडी हे २० जानेवारीपासून बेपत्ता होते. त्यांचे अपहरण झाल्याचा संशय कुटुंबाकडून व्यक्त केला जात असतानाच गाडीच्या डिक्कीत मृतदेह सापडल्याने खळबळ उडाली आहे.

### आरोपी सुदर्शन घुलेला न्यायालयीन कोठडी

**बीड :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुलेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. याआधी डिजिटल पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने सुदर्शन घुलेला पाच दिवसांची एसआयटी कोठडी सुनावली होती. ही कोठडी संपल्यानंतर शुक्रवारी (दि. ३१) बीडच्या विशेष न्यायालयात व्हीसीद्वारे सुनावणी झाली.

# ऐन विधानसभा निवडणुकीत दिल्लीमध्ये आपला खिंडार!

**सात आमदारांनी पक्ष सोडला**

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी आठवड्यापेक्षाही कमी कालावधी शिल्लक असताना अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाला मोठा धक्का बसला आहे. आपच्या सात आमदारांनी शुक्रवारी (दि. ३१) पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देत केजरीवालांवर गंभीर आरोप केले आहेत.

त्रिलोकपुरीचे आमदार रोहित मेहरौलिया, जनकपुरीचे आमदार राजेश ऋषी, कस्तुरबा नगरचे आमदार मदन लाल, मेहरौलीचे आमदार नरेश यादव, पालम येथील आमदार भावना गौर, आदर्श नगरचे आमदार पवन शर्मा आणि बिजवासनचे आमदार बीएस जून यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे. या सर्व आमदारांना पक्षाने २०२५च्या विधानसभा निवडणुकीत तिकीट दिले नाही.

पालम येथील आमदार भावना गौर यांनी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांना पत्र लिहिले आहे, ज्यामध्ये त्यांनी आपण पक्षावरील विश्वास गमावल्याने पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेत असल्याचे म्हटले आहे. कस्तुरबा नगर येथील आमदार मदन लाल यांनीदेखील हीच भावना व्यक्त केली आहे. मेहरौलीचे आमदार नरेश यादव यांनीही पक्षावर भ्रष्टाचाराचा आरोप करत राजीनामा दिला आहे.

त्रिलोकपुरी येथील आम आदमी पक्षाचे आमदार तथा दलित नेते रोहित कुमार मेहरौलिया यांनी, ज्यांना बाबासाहेबांचा केवळ फोटो हवा आहे, त्यांचे विचार नकोत आजपासून अशा संधीसाधू लोकांसोबतचे माझे नाते संपले. मी आम आदमी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वासह सर्व पदांचा राजीनामा देत आहे, असे म्हटले आहे.

जनकपुरी येथून दोन वेळा आमदार राहिलेले राजेश ऋषी यांनी अरविंद केजरीवाल यांना लिहिलेल्या राजीनामा पत्रात, पक्ष आपले मूलभूत सिद्धांत सोडून भ्रष्टाचारात बुडाला आहे. संतोष कोळी यांच्या खुन्याला तिकीट देण्यात आले, हा पक्ष कार्यकर्त्यांचा विश्वासघात आहे, असा आरोप केला आहे.

## जीबीएसचा पुण्यात आणखी एक बळी

**पुणे : प्रतिनिधी**

गुलियन बॅरो सिंड्रोमची (जीबी सिंड्रोम) लागण झालेल्या पिंपळे गुरव येथील ३६ वर्षीय व्यक्तीचा संत तुकारामनगर येथील महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात मृत्यू झाला. या व्यक्तीला जीबी सिंड्रोमची लागण झाली होती.

पिंपळे गुरव येथील ३६ वर्षीय व्यक्ती खासगी कंपनीचे वाहन चालवत होते. त्यांना श्वास घेण्यास त्रास व गिळता येत नसल्याने २१ जानेवारीला महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयामध्ये दाखल केले. दाखल करतेवेळी या रुग्णाला न्यूमोनिया असल्याने श्वास घेण्यास त्रास होत होता. दरम्यान, उपचार सुरू असताना या रुग्णाचा गुरुवारी (दि. ३०) रात्री मृत्यू झाला.

### अंडर-१९ महिला टी-२० विश्वचषक स्पर्धा

# भारतीय संघ फायनलमध्ये; इंग्लंडचा धुव्वा



**क्वालालंपूर : वृत्तसंस्था**

भारताच्या अंडर-१९ महिला संघाने मलेशियामध्ये खेळवल्या जात असलेल्या टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. उपांत्य फेरीच्या सामन्यात भारताने इंग्लंडवर नऊ विकेट्सने मोठा विजय मिळवला. भारताच्या फिरकीपटू गोलंदाजांनी विजयाचा पाया रचला व नंतर सलामीवीरांनी संघाला विजय मिळवून दिला.

भारतीय संघाने टी-२० विश्वचषकाच्या या स्पर्धेत आतापर्यंत एकही सामना गमावलेला नाही. गट फेरीत अजेय राहिल्यानंतर भारताने उपांत्य फेरीत इंग्लिश फलंदाजांना शरणागती पत्करण्यास भाग पाडले. भारतीय गोलंदाजीपुढे इंग्लंडचा संघ २० षटकांत केवळ ११३ धावाच करू शकला. पारुनिका आणि वैष्णवी शर्माने प्रत्येकी तीन, तर आयुषीने दोन बळी टिपले. पारुनिकाला तिच्या उत्कृष्ट गोलंदाजीसाठी सामनावीर म्हणूनही निवडण्यात आले.

भारतीय संघाने पाच षटके शिल्लक ठेवत ११७ धावा करत विजय मिळवला. जी कमलिनीने ५० चेंडूत ५६ धावांची खेळी करत संघाला विजयापर्यंत नेले. जी त्रिशा २९ चेंडूत ३५ धावा करून बाद झाली. सानिका चाळके ११ धावा करून नाबाद राहिली. भारताने इंग्लंडचा पाच षटके आणि नऊ गडी राखून पराभव केला.

यासह टीम इंडियाने सलग दुसऱ्यांदा या स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. त्याआधी पहिल्या उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाचा पराभव केला होता. त्यामुळे आता गेल्या वर्षीप्रमाणे पुन्हा एकदा टी-२० वर्ल्डकप फायनलमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिका आमनेसामने असणार आहेत. हा सामना रविवारी, २ फेब्रुवारीला रंगणार आहेत. भारतीय संघ या स्पर्धेचा गतविजेता आहे.

# रायगडच्या कलिंगडांना दुबईत पसंती!

## गोरेगाव येथील युवा शेतकऱ्याच्या उत्पादनाला मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील गोरेगाव येथील रोहन पाटील या तरुण शेतकऱ्याने २० एकर क्षेत्रावर कलिंगडांची लागवड केली असून पिकवलेली कलिंगडे दुबईला निघाली आहेत. पहिल्या टप्प्यात ४० टन कलिंगडे दुबईत पाठवली जात आहेत.

वाणिज्य शाखेतून पदवीधर झालेला रोहन मागील काही वर्षांपासून शेतीकडे वळला. त्यात त्याची गोडी वाढली आणि आता तो प्रगतशील शेतकरी म्हणून नावारूपाला येत आहे. या शेतीमुळे परिसरातील ५० ते ६० अकुशल कामगारांनाही सहा महिने चांगला रोजगार उपलब्ध होत आहे.

जवळपास २० एकर इतक्या माळरानावर रोहन साळवी याने आठ प्रकारच्या कलिंगडांची लागवड केली आहे. दुबईत सुप्रीत जातीच्या कलिंगडांना दुबईत मोठी मागणी असते. ही बाब लक्षात घेऊन रोहनने या कलिंगडांची लागवड केली. सेंद्रिय खते आणि आधुनिक पद्धतीचा वापर केल्याने अवघ्या ६० दिवसांत इतके दर्जेदार उत्पादन मिळाले की, या मालाला थेट परदेशातून मागणी होऊ लागली आहे.



सध्या कलिंगडे काढणीला आली असून हे काम सुरू आहे. मोठे व्यापारी थेट शेतात येऊन कलिंगडे खरेदी करीत आहेत. त्याला चांगला दर मिळतो. वाहतुकीचा खर्च वाचतो, शिवाय दलाली द्यावी लागत नाही. त्यामुळे दुहेरी फायदा होत असल्याचे रोहन सांगतो.

> **आज आम्ही ४० टन मालाची उचल केली आहे. यातील सुप्रीत जातीच्या कलिंगडांना दुबईमध्ये मोठी मागणी आहे. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतून ही कलिंगडे कंटेनरमधून दुबईला पाठवली जातील. थेट बांधावर खरेदी होत असल्याने शेतकरीदेखील समाधानी आहेत.**
>
> **-जयदेव वावेकर, व्यापारी**

रोहनने शेतावर सोलर पॅनल बसवले आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या विजेवर पंप चालवून नदीचे पाणी तो शेतीसाठी वापरतो. त्यामुळे शेतावर वीजजोडणी घ्यावी लागली नाही.

परदेशात जाणाऱ्या कलिंगडाचे वजन साधारण साडेतीन-चार किलोपासून १२ ते १५ किलोपर्यंत आहे. पूर्ण तयार होण्याच्या साधारण आठ दिवस आधी त्यांची काढणी केली जाते. म्हणजे परदेशात जाईपर्यंत पुढील आठ दिवसांत ती पूर्ण तयार होतात. वाशी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमधून जेएनपीए बंदरातून ही कलिंगडे परदेशी जातात. गेल्या वर्षी दुबईसह, मस्कत, ओमान, हाँगकाँग या देशात कलिंगडे पाठवण्यात आली होती.

# संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्याची सफारीही होणार सुरु

## मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

बोरिवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्याची सफारी सुरु होणार असून आज राज्याचे माहिती तंत्रज्ञान तथा सांस्कृतिक कार्यमंत्री आणि मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड आशिष शेलार यांनी याबाबत घोषणा केली तसेच या उद्यानातील दोन सिंह वर्षभरासाठी त्यांनी दत्तक घेतले आहेत.

मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा पाहणी दौरा केला. या वेळी उपनगराचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, मुख्य वनरक्षक श्रीजी मल्लिकार्जुन, उपसंचालक रेवती कुलकर्णी, सहाय्यक वनरक्षक सुधीर सोनवणे, मुख्य सुरक्षा अधिकारी योगेश महाजन आणि संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.



संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये सध्या वाघ आणि सिंहाच्या दोन सफारी उपलब्ध आहेत. महाराष्ट्राच्या विविध भागात बिबट्यांचे सापडलेले बछडे याच उद्यानात संरक्षित करण्यात आलेले आहेत. त्यांचे पालन करण्यात येते आहे, मात्र पर्यटकांना पाहण्यासाठी त्यांची सफारी उपलब्ध नाही. त्यासाठी सुमारे तीस हेक्टर जागा लागणार असून ही जागा या क्षेत्रात उपलब्ध आहे. तर सफारीसाठी प्रकल्प उभारण्यासाठी सुमारे ५ कोटी खर्च अपेक्षित आहे. अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

या राष्ट्रीय उद्यानाला वर्षभरात २० लाख पर्यटक भेट देतात जर बिबट्याची सफारी उपलब्ध झाली तर पर्यटकांची संख्या वाढेल व त्यातून वनक्षेत्राचे उत्पन्न वाढेल, अशी माहिती देऊन मुख्य वनरक्षक श्रीजी मल्लिकार्जुन यांनी मंत्र्यांसमोर सादरीकरण केले.

दरम्यान, याबाबत आढावा घेतल्यानंतर मंत्री आशिष शेलार यांनी या क्षेत्रात नवी बिबट्याची सफारी सुरू करा, त्यासाठी लागणारा निधी वन खात्याकडून आणि जिल्हा नियोजन समितीमधून आम्ही देऊ, असे त्यांनी सांगितले. तातडीने याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश ही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

**४११ जणांना सुरक्षा कवच**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात ४०० वन मजूर असून ते उन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता तसेच वन्य प्राण्यांचा अधिवास असलेल्या क्षेत्रात स्वतःचा जीव धोक्यात घालून सतत गस्तीचे काम करतात. यातील बहूसंख्य हे आदिवासी बांधव आहेत.

तर मानवी वस्तीमध्ये वन्यप्राणी घुसल्यानंतर त्यांना पकडण्यासाठी जाणारी ११ जणांची टीम असून या सगळ्यांचा प्राण्यांशी थेट संपर्क येतो. मात्र या सगळ्यांचा सुरक्षा विमा उतरवण्यात आलेला नाही, ही बाब मंत्री आशिष शेलार यांच्या निदर्शनास आली. त्यामुळे त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने याबाबत निर्देश दिले व या सगळ्यांचा सुरक्षा विमा उतरवण्यास सांगितले. त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देऊ अशी ग्वाही दिली.

**भारत, भारतीला पालकमंत्र्यांनी घेतले दत्तक**

*या उद्यानात भारत आणि भारती हे तीन वर्षाचे दोन सिंह नुकतेच २६ जानेवारीला गुजरात मधून आणण्यात आले आहेत. त्यांना वर्षभरासाठी मंत्री ड. आशिष शेलार यांनी दत्तक घेतले असून त्यांच्या पालनपोषणासाठी होणारा खर्च ॲड. आशिष शेलार वैयक्तिक रित्या करणार आहेत.*

# म्हसळा ग्रामीण रुग्णालयातील डायलिसिस सेंटरचे लोकार्पण

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण विभाग अंतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक रायगड अलिबाग आणि एच.एल. एल.लाईफ केअर लि.यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण रूग्णालय म्हसळा येथे सुरु करण्यात आलेल्या डायलिसिस सेंटरचे लोकार्पण महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते आज करण्यात आले. या डायलिसिस सेंटरच्या माध्यमातून रुग्णांना मोफत सेवा देण्यात येणार असल्याची घोषणा तटकरे यांनी यावेळी केली.



या कार्यक्रमाला वैद्यकीय अधीक्षक डॉ प्रफुल्ल पावसेकर,उप जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. किरण शिंदे, मुख्याधिकारी विठ्ठल राठोड,स.पो.निरिक्षक संदीप कहाळे,सा.बांधकाम अभियंता श्री महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलतांना तटकरे म्हणाल्या, म्हसळा या ग्रामीण रुग्णालयात स्वतंत्र कक्षात ५ डायलिसिस मशीन व बेडची व्यवस्था करण्यात आली आहे. दरदिवसाला १५ डायलिसिस रूग्णांना सेवा दिली जाणार आहे. डायलिसीस सुविधा देणारे हे रायगड जिल्हयातील सर्वात मोठे केंद्र आहे. अशा प्रकारे जिल्हयात ३२ केंद्र मंजुर करण्यात आले आहेत. संपुर्ण राज्यात शासनाने ४०० डायलिसिस केंद्रांना मंजुरी दिली असून त्यामधे रोज ३००० रुग्णांना सेवा दिली जाणार आहे. श्रीवर्धन मतदार संघात श्रीवर्धन येथे २,माणगाव २, आणि रोहा येथे ३ मशीन ऊपलब्ध आहेत. जास्तीत जास्त रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन तटकरे यांनी केले.

# खालापूर नगरपंचायतीचे अतिक्रमण हटाव पथक निष्क्रिय

## भाजपची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार



**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपंचायत खालापूर हद्दीत अतिक्रमणाचा झालेला सुकाळ आणि त्याकडे अतिक्रमण विरोधी पथकातील अधिकार्यांवे होत असलेले दुर्लक्ष यामुळे नागरिक संतप्त झाले आहेत. भाजपा शहर अध्यक्ष दीपक जगताप यांनी अतिक्रमण पथकातील अधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी जिल्हाधिकार्यांकडे केली आहे.

नगरपंचायत हद्दीत नदीकिनारी बेकायदेशीरपणे गॅबियन भिंतीचे काम सुरू असताना अधिकाऱ्यांनी डोळेझाक केल्याचा आरोप नागरिक करत आहेत. बांधकाम परवाना नसताना दिवसाढवळ्या सुरू असलेले बांधकाम थांबवण्याची हिंमत न दाखवल्याने जवळपास पन्नास फूट लांबीची भिंत नदीकिनारी उभी राहिली आहे. पाटबंधारे विभागाचे अधिकारी नगरपंचायतीकडे बोट दाखवत होते .तर नगर पंचायत अतिक्रमण पथकातील अधिकारी पाटबंधारे विभागाच्या कारवाईची वाट बघत बसल्याने बेकायदेशीरपणे भिंतीचे काम जवळपास पूर्ण झाले आहे .

या संरक्षक भिंतीमुळे पावसाळ्यात पुराची भीती असल्याने नागरिकांनी नगरपंचायत कार्यालयात तक्रारी केल्या .परंतु ठोस निर्णय होईपर्यंत भिंत उभी राहिली आहे. अतिक्रमण पथकातील अधिकारी जर काम करत नसतील तर त्यांची चौकशी व्हावी अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष दीपक जगताप यांनी केली आहे.

**“नगरपंचायत हद्दीत काम करत असताना नगरपंचायतीचा ना हरकत दाखला घेण्याची तसदी देखील संबंधित ठेकेदार घेत नसेल आणि त्याचा जाब अतिक्रमण पथकातील अभियंता विचारत नसतील तर यामध्ये साटलोट आहे असं वाटत. अधिकाऱ्यांवर कोणाचा दबाव असेल तर त्यांनी त्याचा खुलासा करावा आणि त्यांनी वेळोवेळी केलेल्या कारवाईची लेखी माहिती मिळावी अशी मागणी केली आहे.**

**–दीपक जगताप,**

**भाजपा शहर अध्यक्ष खालापूर**

# माणगाव नगरपंचायत विषय समिती सभापतींची बिनविरोध निवड

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव नगरपंचायतीच्या विषय समिती सभापती यांची निवडणूक गुरवार दि.३० रोजी बिनविरोध झाली. या निवडणुकीचे पीठासन अधिकारी म्हणून माणगाव तालुक्याचे उपविभागीय अधिकारी डॉ.संदीपान सानप यांनी तर मदतनीस म्हणून माणगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी काम पाहिले.



या निवडणुकीत पाणी पुरवठा,सामाजिक न्याय व शिक्षण समिती सभापतीपदी वॉर्ड क्र.११ मधून निवडून आलेले नगरसेवक कपिल नरेंद्र गायकवाड,स्वच्छता,आरोग्य व क्रीडा समिती सभापतीपदी वार्ड क्रमांक ७ मधून निवडून आलेल्या नगरसेविका सुशीला शिवाजी वाढवळ, नगरपंचायतीच्या महिला,बालकल्याण व युवक कल्याण समिती सभापतीपदी वार्ड क्रमांक ८ मधून निवडून आलेल्या नगरसेविका नंदिनी नितीन बामगुडे हे बिनविरोध निवडून आले असून नगरपंचायतीचे बांधकाम,नियोजन व दिवाबत्ती समिती सभापती पदसिद्ध उपनगराध्यक्षा हर्षदा काळे हे कामकाज पाहत आहेत

माणगाव नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक सन २०२१–२२ मध्ये झाली. या माणगाव नगरपंचायतीत महायुतीची सत्ता आहे.या पाच वर्षाच्या कारकिर्दीत नगराध्यक्ष ,उपनगराध्यक्ष,नगरसेवक नगरसेविका याना विहित मुदतीत काम करण्याची संधी विषय समिती सभापती यांच्या माध्यमातून महायुतीकडून दिली जात आहे. सर्व नवनिर्वाचित सभापती यांचे आमदार भरत गोगावले, शिवसेना नेते ॲड. राजीव साबळे, नगराध्यक्ष शामिल सुर्वे, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, उपनगराध्यक्ष हर्षदा काळे, माणगाव शहर राष्ट्रवादी अध्यक्ष नितीन वाढवळ, माजी उपनगराध्यक्ष राजेश मेहता, माजी उपनगराध्यक्ष संदीप खरंगटे, रत्नाकर उभारे, दिलीप जाधव, सचिन बोंबले, यांच्यासह आजी– माजी नगरसेवक, नगरसेविका व कार्यकर्त्यांनी तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# समरभूमी उंबरखिंड येथे उद्या विजय दिन

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील छावणी (चावणी) येथे समरभूमी उंबरखिंड येथे ३६४ व्या विजय दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा विजयदिन सोहळा रविवारी (दि.२ फेब्रुवारी) आयोजित करण्यात येणार आहे.

सकाळी शिवभूषण, तथा रायगड भूषण शिवशाहीर वैभव घरत, यांचा मराठामोळी पोवाडा व स्फूर्ती गीत प्रबोधनकार शाहिरी कार्यक्रम, होणार आहे, तर शिवव्याख्याते शिरीष महाराज मोरे यांचे व्याख्यान होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी समरभूमी उंबरखिंड येथे कारलतलब खानाच्या असंख्य मुघल सैनिकांवर महाराजांनी मूठभर मावळे घेऊन मोठा विजय मिळवला होता. त्यांचे स्मरण आणि आठवणींना उजाळा मिळावा यासाठी समरभूमी उंबरखिंड येथे ग्रामस्थ, ग्रामपंचायत चावणी, पंचायत समिती खालापूर आणि. जिल्हा परिषद रायगड आणि शिवदुर्ग मित्र मंडळ लोणावळा यांच्या वतीने दरवर्षी मोठ्या उत्साहात विजय दिन सोहळा साजरा करून विजय स्तंभाला अभिवादन करण्यात येते असते.

# यम हल्ली रेड्याऐवजी चाकावरून येतो, त्याला रोखणे तुमच्या हातात –विनय मोरे

**कर्जत : प्रतिनिधी**

यम हल्ली रेड्या ऐवजी चाकावरून येतो त्याला रोखणे केवळ तुमच्या हातात आहे म्हणूनच प्रत्येक जण व्हायला हवा भगवान श्रीकृष्णासारखा कुशल सारथी विवेकी आणि संयमी होऊ चला. आपणच वाहनांचा दहशतवाद थांबविला पाहिजे. त्यासाठी स्वतःपासून आरंभ करूया! वाहतूक नियमांचे पालन करूया अपघात विरहित देश घडवूया! ’ असे महत्वपूर्ण प्रतिपादन सारथी सुरक्षा संस्थेचे विनय मोरे यांनी येथे केले.

कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयातील सेमिनार हॉल मध्ये समर्थ मोटार ट्रेनिंग स्कूलच्या सहकार्याने रस्ता सुरक्षा जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. मोहन काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून उपक्रमाची माहिती दिली. याप्रसंगी विभागीय परिवहन विभागाचे मोटार वाहन निरीक्षक अजय कराळे, सहायक मोटार वाहन निरीक्षक प्रीती पवार, उपप्राचार्य डॉ. अमोल चांदेकर, डॉ. निलोफर खान, समर्थ मोटार ट्रेनिंग स्कूलचे निलेश मराठे, अभिजीत मराठे आदी उपस्थित होते.

मोटार वाहन निरीक्षक अजय कराळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ’रस्ते सुरक्षा ही केवळ जबाबदारी नसून ती प्रत्येक व्यक्तीची गरज आहे. आपण चालक असो, प्रवासी असो किंवा पादचारी, अपघात टाळणे आणि सुरक्षित प्रवास सुनिश्चित करणे आपले कर्तव्य आहे. वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे, अशा कार्यक्रमांद्वारे शिस्त, जागरूकता, आणि जबाबदारी यांचे महत्त्व समजते. चला संकल्प करूया आणि अपघात विरहित रायगड जिल्हा बनवूया.’ असे स्पष्ट केले. सहायक वाहन निरीक्षक प्रीती पवार यांनी रस्त्याने वाहतूक करताना वाहन चालक म्हणून कोणकोणते नियम पाळले पाहिजेत याबाबत माहिती दिली. रस्त्याने प्रवास करताना एखादा अपघात झाला तर अपघात ग्रस्तांना कशी मदत केली पाहिजे यावर देखील मार्गदर्शन या शिबिरात करण्यात आले.

सुरक्षा अभियान रस्ता सुरक्षा जनजागृती मोहिमेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. त्या सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे विनय मोरे यांनी दिली. शिवाय दृकश्राव्य पद्धतीने नियम धाब्यावर बसवून वाहने चालवणाऱ्यांचे काय हाल होतात? ते दाखवून सुरक्षेसाठी काय केले पाहिजे? हे सुध्दा सांगितले.

सूत्रसंचालन प्रा. अस्फिया खान यांनी केले. निलेश मराठे यांनी आभार प्रदर्शन केले. या प्रसंगी डॉ. उज्वला ठुबे, प्रा. सतीश पांडव, प्रा. निलेश बोंडे, प्रा. विशाल शेळके, निशिकांत मोधळे, महेश म्हात्रे, अर्जुन गोरखा आदींसह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरगुती वीज ग्राहकांना दिवसाच्या वापराला सवलत व दरात कपात

**कल्याण : प्रतिनिधी**

महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाखल केलेल्या वीजदर याचिकेमध्ये घरगुती ग्राहकांसाठीच्या वीजदरात टप्प्याटप्प्याने कपात करण्यास परवानगी मागतानाच दिवसा वीज वापरल्यास त्यांना अधिक सवलत देण्याचेही प्रस्तावित केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने गेल्या अडीच वर्षात ऊर्जा परिवर्तनासाठी भरीव काम करून अपारंपरिक ऊर्जा वापराला महत्त्व दिले आहे. सौरऊर्जेद्वारे निर्माण झालेली वीज स्वस्तात मिळाल्यामुळे महावितरणला विजेचे दर कमी करणे शक्य होणार आहे. त्यासोबतच सौरऊर्जा दिवसा मिळणार असल्याने त्यावेळी जे घरगुती ग्राहक वीज वापरतील त्यांना प्रत्येक युनिटमागे ८० पैसे ते १ रुपया सवलत देण्याचा प्रस्ताव मांडणेही महावितरणला शक्य झाले आहे.

महावितरणने विद्युत नियामक आयोगाकडे सादर केलेल्या प्रस्तावानुसार घरगुती ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेतील वीज वापरासाठीच्या दरात सवलत देण्यात येईल. आर्थिक वर्ष २०२५–२६मध्ये प्रती युनिट ८० पैसे, २०२६ –२७मध्ये ८५ पैसे, २०२७ –२८ मध्ये ९० पैसे, २०२८ –२९मध्ये ९५ पैसे आणि २०२९ –३० या वर्षात एक रुपया सवलत देण्यात येईल. या प्रस्तावाला आयोगाने मान्यता दिल्यानंतर १ एप्रिलपासून ही सवलत सुरू होऊ शकते.

**टीओडी मीटर मिळणार मोफत**

टीओडी सुविधा मिळण्यासाठी वीज ग्राहकाने कोणत्या वेळेला विजेचा वापर केला हे समजणे आवश्यक आहे. घरगुती ग्राहकांकडे सध्या बसविलेल्या मीटरमध्ये टीओडीची सुविधा नाही. तथापि, घरगुती ग्राहकांना टीओडी सवलतीचा लाभ घेता यावा यासाठी महावितरणकडून त्यांना मोफत टीओडी मीटर बसवून देण्यात येत आहेत.

## माजी विद्यार्थ्यांकडून नांदगाव हायस्कूलला संगणक संच भेट

**मुरुड : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव येथील सन १९८२–८३ व ८३–८४च्या एस.एस. सी बॅचमधील माजी शालेय विद्यार्थ्यांकडून स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. या वेळी या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांकडून नांदगाव हायस्कूलला संगणक संच भेट म्हणून देण्यात आला.

या वेळी सहजीवन विद्या मंडळाचे अध्यक्ष फैरोज घलटे, संचालक कृष्णा अंबाजी, गणेश गाणार यांनी ही भेट स्वीकारली. सदरील कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका अर्चना खोत, पर्यवेक्षक, शिक्षक आदी मान्यवर व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माणगाव तालुका शिक्षक समन्वय समिती अध्यक्षपदी विनया जाधव



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांच्या समविचारी संघटनांची सहविचार सभा माणगाव येथे नुकतीच उत्साहात झाली. सदर सभेत समितीचे अध्यक्षपदी आदर्श शिक्षिका विनया जाधव यांची एकमताने निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

या सभेत शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांविषयी समस्या सोडवण्यासाठी चर्चा करुन माणगाव तालुका शिक्षक समन्वय समिती स्थापन करण्याच्या सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. सदर समितीचे पदाधिकारी सर्वानुमते बहुमताने निवडण्यात आले आहेत. अध्यक्ष विनया जाधव, सचिव सुजित भोजने, कार्याध्यक्ष संतोष मालोरे, संतोष उतेकर, उपाध्यक्ष बालाजी गोंड, विजय शिंदे, कोषाध्यक्ष सुनील गोरेगावकर, मार्गदर्शक सचिन कदम, गणेश निजामकर, संदीप शिंदे, सूर्यकांत कासे, कार्यकारिणी सदस्य म्हणून राकेश मडवी, संदीप साळवी, सचिन गंगावणे, गजानन देवकर, संजय खैरे, ध्रुवसिंग पावरा, अनिल नाचपल्ले, संजय पाटोळे यांची निवड झाली. या सभेसाठी माणगाव तालुक्यातील संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

माणगाव तालुका शिक्षक समन्वय समितीच्या पदाधिकारी यांचे हार्दिक अभिनंदन केले. सदर निवड होताच राजाध्यक्ष राजेश सुर्वे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र म्हात्रे, खलील बहुर यांनी दुरध्वनीवरुन अभिनंदन केले आणि पुढील शिक्षकांच्या प्रती कार्य वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या.

पान १ वरुन

## एकही झोपडीधारक बेघर होणार नाही; आम्ही तुमच्या ठामपणे पाठीशी!

झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी पालिका आयुक्तांची भेट घेऊ. गरज भासल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री व संबंधित अधिकाऱ्यांना भेटून हा प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन देत तुम्हाला सर्वांना न्याय भेटेल आणि जोपर्यंत पुनर्वसनाच्या बाबतीत न्याय मिळत नाही तो झोपडपट्टीवासीयांच्या एकाही घराला हात लावू देणार नाही, असा विश्वास देत भाजप तुमच्या पाठिशी काल होता, आज आहे आणि उद्याही राहील, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आश्वासित करत नागरिकांमधील संभ्रावस्था दूर केली. या बैठकीमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त करून आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपच्या पदाधिकाऱ्यांना धन्यवाद दिले.

# पनवेलमध्ये कुष्ठरोग जनजागृती अभियान

## महापालिकेतर्फे सर्वेक्षण करून दिले जाणार मोफत उपचार





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षी ३० जानेवारी रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या पुण्यतिथीनिमित्त कुष्ठरोग निवारण दिन साजरा करण्यात येतो. या अनुषंगाने पनवेल मनपाच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, आपला दवाखाना येथे गांधीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कुष्ठरोग निवारण दिन साजरा करण्यात आला. या वेळी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कुष्ठरोग मुक्तीबद्दल प्रतिज्ञा घेतली.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनूसार ३१ जानेवारी ते १४ फेब्रुवारीपर्यंत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली या पंधरवड्यात मनपा कार्यक्षेत्रात विशेष कुष्ठरोग शोधमोहीम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत कुष्ठरोग सर्वेक्षण करून जास्तीत जास्त कुष्ठरूग्णांचा शोध घेऊन त्यांना त्वरित मोफत उपचार दिले जाणार आहेत.

दरम्यान, कुष्ठरोगाबाबत जनजागृती करण्याकरिता नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वतीने आरोग्य शिक्षण कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. यामध्ये रांगोळी स्पर्धा, शालेय प्रभात फेरी, निबंध स्पर्धा, पथनाट्य इत्यादी उपक्रम राबविले जात आहेत. या अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कामोठे येथे आज गुरूवारी रांगोळी स्पर्धेचे व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र २ कोळीवाडा येथे पथनाट्य आयोजित करण्यात आले तसेच ४ फेब्रुवारी रोजी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५ खारघर येथे कुष्ठरोग जनजागृती मॅरेथॉनचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली आहे.

कुष्ठरोग जनजागृती व कुष्ठरूग्णाचे लवकर निदान, त्यावरील त्वरित उपचार हे या संपूर्ण अभियानाचे उद्दिष्ट हे आहे.



**पनवेल : चिंचवली गावात हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार आणि प्राणप्रतिष्ठा सोहळा शुक्रवारी मोठ्या भक्तीपूर्ण वातावरणात झाला. यानिमित्ताने भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी फुलचंद पाटील, परशुराम रिकामे, बाळकृष्ण बोलाडे, लहू मुंढे, सुरेश रिकामे, संतोष मुंढे, दीपक रिकामे, महेंद्र खाने, गुरूनाथ मुंढे, प्रमोद खाने, रामचंद्र खाने, सचिन मुंढे, गुरूनाथ ठोंबरे, किशोर मुंढे, दिनेश पाटील, दिलीप फराड, मारूती बोलाडे, लक्ष्मण घोंगे, राम पाटील, केतन मुंढे, संदीप ठोंबरे, जयेश काठवले, ऋतिक मुंढे, नितीन मुंढे, गोटीराम रिकामे आदी उपस्थित होते.**



**पनवेल : करंजाडे ग्रामपंचायतीचे उपसरपंच सागर आंग्रे यांच्या घरी गुरुवारी साई भंडारा आयोजित करण्यात आला होता. यानिमित्ताने भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. या वेळी आंग्रे कुटुंबीयांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, युवा मोर्चा जिल्हा सचिव शुभ पाटील आदी उपस्थित होते.**

## शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसीचे आवाहन

**उरण : वार्ताहर**

शिधापत्रिकेच्या माध्यमातून सरकार गरीब, गरजू लोकांना परवडणाऱ्या दरात जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देते, मात्र या लाभाचा योग्य व्यक्तींनाच फायदा व्हावा यासाठी आता ई-केवायसी अनिवार्य करण्यात आले आहे. तुमचे ई-केवायसी पूर्ण झाले नसेल, तर लवकरच ते पूर्ण करा; अन्यथा तुमच्या शिधापत्रिकेवरील लाभ बंद होण्याचा धोका आहे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी यांचा सूचनेनुसार उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी केले.

ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शिधापत्रिका आणि आधार कार्ड ही दोन महत्त्वाची कागदपत्रे आवश्यक आहेत. सर्वप्रथम रेशनधारकांनी रेशनकार्ड घेऊन जवळच्या रेशन दुकानात जा. तेथे तिथला दुकानदार तुमचा अंगठा पॉस मशीनवर ठेवेल आणि तुमची ओळख सत्यापित करेल. मशीनवर तुमचा अंगठा यशस्वीरित्या स्कॅन झाल्यावर तुमची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण होईल, अशी माहिती तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी दिली.





**पनवेल : भाजपचे कार्यकर्ते केदार भगत यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहर सरचिटणीस अमित ओझे, युवा मोर्चा उपाध्यक्ष चिन्मय समेळ, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंजावराव, उमेश इनामदार, प्रतिक बहिरा, फिरोझ शेख, विशाल सावंत, प्रसाद म्हात्रे आदी उपस्थित होते. सर्वांनी केदार भगत यांचे वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन केले.**



**उरण : केंद्रीय शिपिंग राज्यमंत्री शांतनु ठाकूर यांनी बुधवारी जेएनपीए बंदरास भेट दिली. या वेळी त्यांचे भारतीय मजूर संघातर्फे स्वागत करण्यात आले. या वेळी जेएनपीए चेअरमन उमेश वाघ, केंद्र नेते व पोर्टचे प्रभारी अण्णा धुमाळ, महासंघाचे महासचिव सुरेश पाटील, कोषाध्यक्ष सुधीर घरत, अनिल शिर्लेकर तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.**

## सायबर गुन्हेगारीच्या सावधगिरीबाबत जागृती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनीतील आनंदी ग्रुप अंतर्गत एसीएफके, एमवायजी व एसबीएससी आणि केबीसी ग्रुपच्या वतीने आयोजित कार्यक्रमांमध्ये खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षक स्मिता ढाकणे यांनी समाजात होत असलेल्या सायबर गुन्हेगारीमुळे सावधगिरी बाळगण्याविषयी माहिती दिली.

या वेळी आनंदी ग्रुपने त्यांच्या समस्यादेखील मांडल्या तसेच वर्षभर सर्व ग्रुपतर्फे जे कार्यक्रम आयोजित करतो त्या संदर्भात संजय पाटील यांनी स्मिता ढाकणे यांना सर्व माहिती दिली. या वेळी भीमराव पोवार व अन्य सदस्य उपस्थित होते.

## उमरोलीच्या उपसरपंचपदी भाजपच्या रेश्मा पाटील

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील उमरोली ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शुक्रवारी (दि. ३१) भारतीय जनता पक्षाच्या रेश्मा दीपक पाटील यांची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

ग्रुप ग्रामपंचायत उमरोलीच्या उपसरपंचपदी रेश्मा पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले. या वेळी सरपंच श्वेता मढवी, माजी सरपंच शांताराम पोपेटा, अलका तांडेल, शुभांगी मढवी, नितीन काठावले, माजी उपसरपंच रोशन पोपेटा, प्रितेश डांगरकर, पंकज वारदे, कमळा मढवी, सदस्य किरण डांगरकर, नारायण माळी, रवींद्र पाटील, प्रवीण पाटील आदींसह जय हनुमान क्रिकेट संघातील सदस्य उपस्थित होते.




## गव्हाण विद्यालयात महात्मा गांधी पुण्यतिथी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये अभिवादन करण्यात आले. या वेळी प्राचार्य गोवर्धन गोडगे, 'रयत'चे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सातवी अ च्या वर्गशिक्षिका उर्मिला गोंधळी आदी उपस्थित होते.






**पनवेल : सुकापूर येथे रुख्मिणी महिला मंडळाच्या वतीने आयोजित श्री सत्यनारायणाच्या महापुजेला माजी नगरसेविका दर्शना भोईर आणि जेबीएसपीच्या संचालिका वर्षा ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी मंडळाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.**

## उडान महोत्सवात युईएस महाविद्यालयाचे यश

**उरण : वार्ताहर**

मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार कार्य (डी एल एल ई ) विभागाच्या वतीने सोमवारी कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, वाशी येथे उडान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये युईएस महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केली.

या महोत्सवात रायगड जिल्ह्यातीलनवी मुंबई, पनवेल तसेच उरण परिसरातील एकूण २१ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. या महोत्सवामध्ये युईएस कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य, पोवाडा, क्रिएटिव्ह रायटिंग, पोस्टर मेकिंग आणि वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेतला होता.

ज्यातील पोस्टर मेकिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक तर पोवाडा या स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक विद्यार्थ्यांना मिळाला. पथनाट्य, क्रिएटिव्ह रायटिंग आणि वक्तृत्व स्पर्धेतही युईएसच्या विद्यार्थ्यांनी अप्रतिम अशी कामगिरी केली.

विद्यार्थ्यांच्या या अद्वितीय कामगिरीमुळे



युईएस संस्थेचे अध्यक्ष तनसुख जैन, उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, मानद सचिव आनंद भिंगार्डे, सहसचिव अॅड. अपूर्वा ठाकूर, खजिनदार चंद्रकांत ठक्कर, सदस्य अॅड. राजेंद्र भानुशाली, प्रभारी प्राचार्या डॉ. मीनाक्षी गुप्ता, सीनियर कॉलेजच्या बीएससीआयटी व बीकॉम विभागातील विभाग प्रमुख, शिक्षक व पालकांकडून सर्व विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

पथनाट्य व पोवाडा याचे लिखाण विद्यार्थी दुर्वेश वर्तक याने केले होते, तर दिग्दर्शन आणि मार्गदर्शन गणेश जाधव आणि निकिता म्हात्रे (डीएलएलई प्रमुख) तसेच विनीत पवार यांनी केले होते. बीएससीआयटी विभागाच्या प्रमुख सौ. मनाली तांबडकर, ह्या सर्व विद्यार्थी व डीएलएलई प्रमुख यांच्यासोबत स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित होत्या.

## संपादकीय

# उत्सवापूर्वी तोडगा हवा

माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने पुन्हा पीओपीच्या गणेशमूर्तींसंबंधातील वाद चर्चेत आला आहे. या वेळी मूर्तीकारांनीही काहिसा आक्रमक पवित्रा घेतल्याचे दिसते. याप्रश्नी सर्वसंबंधितांना वास्तव परिस्थितीची नीट जाणीव करून देऊन, जागरुकता निर्माण करून तोडगा काढण्याची गरज आहे. अन्यथा दरवेळी उत्सवाच्या तोंडावर हा वाद उफाळून येतच राहील.

**यंदा शनिवारी १ फेब्रुवारी रोजी माघी गणेश जयंती सगळीकडे उत्साहात साजरी केली जाणार आहे. महाराष्ट्रात या दिवशी काही घरांमध्ये तसेच सार्वजनिक गणेश मंडळांकडूनही बाप्पाची प्राणप्रतिष्ठा केली जाते. अलीकडे अनेक ठिकाणी दीडहून अधिक दिवसांसाठीसुद्धा मूर्तीची स्थापना होते. भाद्रपदातील गणेशोत्सवात पावसाचा फटका कार्यक्रमांना बसतो. तसे माघी गणेशोत्सवात होत नसल्यामुळे हा उत्सवही झपाट्याने लोकप्रिय होत चालला आहे. उत्सव साजरा करताना प्रदूषण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे हे बरोबरच. लोकांच्या धार्मिक भावना न दुखावता यासंदर्भात चर्चेने तोडगा काढला पाहिजे. भव्य गणेशमूर्तींसमोर नतमस्तक होताना येणारा अनुभव आनंददायी असतो. पण दोन्ही गणेशोत्सवांच्या लोकप्रियतेत झपाट्याने वाढ होत असल्याने मूर्तींची संख्या अफाट वाढत चालली आहे हे वास्तव आहेच. त्यातूनच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी घालण्याचा निर्णय केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने घेतला, परंतु या निर्णयाची प्रत्यक्षात पूर्णपणे अंमलबजावणी होण्यात काही अडथळे आहेत असे दिसते. बंदी असूनही त्याची अंमलबजावणी होत नसल्याची गंभीर दखल मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी घेतली व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या १२ मे २०२० रोजीच्या सुधारित मार्गदर्शक तत्वांप्रमाणे 'पीओपी' मूर्तींवरील बंदीची यापुढे काटेकोर अंमलबजावणी करावी असा स्पष्ट आदेश राज्य सरकार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच राज्यभरातील महापालिकांना व सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिला. या सुनावणीत मूर्तीकारांनी आपण केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वांना आव्हान दिले असल्याचे सांगितले, परंतु सद्यस्थितीत पीओपी मूर्तींवरील बंदी ही सर्वोच्च न्यायालयाने कायम केलेली असल्याने मूर्तीकारांना कोणताही दिलासा देऊ शकत नाही. भविष्यात त्यांना अंतिम सुनावणीत यश आल्यास वेगळा मुद्दा आहे असे मुख्य न्यायमूर्तींनी स्पष्ट केले. उत्सवाच्या ऐन तोंडावर बंदीच्या अंमलबजावणीचा मुद्दा मांडला जातो हे मूर्तीकारांचे म्हणणे आहे. मूर्ती बनवण्याची प्रक्रिया कितीतरी आधी सुरू होत असते. पर्यावरणाच्या दृष्टीने पीओपीच्या मूर्तींवर बंदी आणावयाची असल्यास त्याची अंमलबजावणी ही निर्मितीची प्रक्रिया सुरू होतानाच व्हायला हवी. अन्यथा निव्वळ उत्सवाच्या तोंडावर वाद असेच या चर्चेचे स्वरूप राहणार आहे. पर्यावरणावर पीओपींच्या मूर्तींचा नेमका काय आघात होतो याचा वैज्ञानिक अभ्यास झालेला नाही असे मूर्तीकारांचे म्हणणे असेल तर प्रदूषण नियंत्रण मंडळाने व यासंदर्भात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनीही समाधानकारकरित्या संबंधित वास्तव मूर्तीकार समुदायाला पटवून द्यायला हवे. जागरूकता निर्माण केली नाही तर विरोध होतच राहील. या बंदीमुळे मूर्तीकारांच्या उपजीविकेवर परिणाम होत असल्याचेही त्यांचे म्हणणे आहे. यासंदर्भातील याचिका अनेक उच्च न्यायालयांनी फेटाळल्या आहेत. त्यांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष न करता, त्यासंदर्भात काही तोडगा काढता येऊ शकतो का याचाही विचार व्हायला हवा. मुंबई उच्च न्यायालयाने यासंदर्भातील याचिकेवरील पुढील सुनावणी २० मार्च रोजी निश्चित केली आहे. भाद्रपदातील गणेशोत्सवापूर्वी याप्रश्नी निश्चित असा तोडगा काढला गेल्यास उत्सवाच्या तोंडावर निर्माण होणारा वाद टाळता येईल.**

# चिरनेरचा पेशवेकालीन स्वयंभू श्री महागणपती

रायगड जिल्ह्याच्या उरण तालुक्यातील चिरनेर शब्द उच्चरताच येथील श्री. महागणपती व चिरनेर जंगल सत्याग्रह ही दोन नावे प्रामुख्याने समोर येतात. ऐतिहासिक महत्व असलेल्या या चिरनेर गावात स्वयंभू पेशवेकालिन श्री.महागणपती मंदिर आहे. तर याच गावात शिलाहार राजाच्या कारकिर्दीत शिवालय उभारण्यात आले असावे. पेशव्यांच्या काळात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गणेशाची मंदिरे उभारण्यात आली. त्यामुळे चिरनेर येथे सुभेदारांच्या कृपेने महागणपतीच्या देवळाची निर्मिती करण्यात आली.





मंदिराचे बांधकाम पूर्णपणे शास्त्रशुद्ध असून, जीर्णोद्धाराच्या वेळी पासून यात कोणताही बदल केलेला नाही. मुख्य देऊळ पूर्वी सारखेच सुरक्षित आहे. जाणकारांच्या मते हे मंदिर हेमांड पंथीय आहे. मंदिराचे बांधकाम सिमेंट चुनारहित चिरेबंदी दगडाचे असून, चिरे फारच प्रचंड आहेत. आतील गाभाऱ्यात वरच्या कळसाच्या बाजूस अष्टकोनी नक्षिकाम साधून, कमळ पाकळ्यांचा घुमटीचा आकार घेतला आहे. त्यामुळे त्यात घुमणारे ओंकार व शंखनाद एकाच वेळचे चैतन्य निर्माण करते. महागणपतीची मूर्ती पूर्वभूमिख असून,डाव्या सोंडेची आहे. मूर्तीच्या मागे दोन खांबावर महिरपी सप्त कमान आहे.अतिशय लोभसवाणी व अष्टविनायकाचा विचार करता, भव्य असणाऱ्या या गणपतीची पूजा श्रीमंत पेशव्यांनी केल्याचा उल्लेख मराठेशाहीत सापडतो. दिवाबत्तीच्या व्यवस्थेकरिता देवस्थाच्या नावे शेतजमीन आहे.संकट निवारण करणारा आणि भक्तांच्या हाकेला धावणारे दैवत म्हणून प्रचिती असलेल्या चिरनेर महागणपतीच्या दर्शनासाठी संकष्ट चतुर्थी, अंगारकी चतुर्थी, मंगळवार आणि सुट्टीच्या रविवारी राज्याच्या विविध ठिकाणाहून भाविक दर्शनासाठी येत असतात. गणेश जयंतीच्या दिवशी दरवर्षी गर्दीचा उच्चांक होत असतो. या उत्सवा निमित्त चिरनेर गावातील नागरिकांनी गावातील रस्ते स्वच्छ ठेवण्याचे काम सुरूच असते. तर विविध मंडळानी भक्तगणांच्या स्वागताचे फलक जागोजागी उभे करण्याची प्रथा आहे.

निसर्गाने नटलेल्या पौराणिक आणि घटनांची साक्ष देणाऱ्या ऐतिहासिक उरण तालुक्यात हे महागणपतीचे मंदिर चिरनेर येथे असून, पेशव्यांच्या काळात या मंदिराचे बांधकाम केलेले आहे. हे गणपती देवस्थान अत्यंत जागृत असून, या ठिकाणी येणाऱ्या भक्तांची दुःखे निश्चित दूर होतात, अशी भक्तांची श्रद्धा आहे. अशी अनुभूती महागणपतीचे दर्शनास येणाऱ्या भाविकांना आली आहे. विवाहाच्या व सत्यनारायणाच्या पूजेआधी या भागातील वधू-वर आणि नागरिक सर्वप्रथम महागणपतीचे दर्शन घेऊनच पुढील विधीला प्रारंभ करतात.

चिरनेरच्या महागणपतीची मूर्ती आकाराने जशी मोट्ठी आहे तसेच भाविकांना चांगले अनुभव देण्यातही मोठी आहे.या महागणपतीची सेंदूर चर्चित पाषाणी दगडाची पूर्वाभूमिख मूर्ती सहा फूट उंच व साडेतीन फूट रुंद अशी चतुर्भूज असून हातात खडग व पाश आहेत. श्रींच्या मस्तकावरील मुकुट सोन्याचे आहे. गणेश मंदिराच्या समोर असलेल्या तलावात ही गणेशाची मूर्ती तळ्याचे खोदकाम करतांना सापडली असल्याची कथा आहे.

चिरनेर येथील महागणपती मंदिर अद्याप सर्वदूर प्रसिद्ध पावले नसले तरी त्यातील गणरायाच्या आगळ्या वेगळ्या भव्य अशा देखण्या रूपामुळे महाराष्ट्रात अष्टविनायका नंतर नववा गणपती असा बोलबाला होऊ लागला आहे. हे मात्र तितकेच खरे ठरत आहे.त्यामुळे चिरनेर गावचे आराध्यदैवत असलेल्या या महागणपतीने चिरनेर गावाचे नाव लौकिक केले आहे.

चिरनेर महागणपती क्षेत्रात भाविकांचा ओघ अधिकच प्रमाणात वाढत आहे. माघ शुद्ध चतुर्थी या गणेश जयंती दिनी भाविकांची गर्दी ही विक्रमी ठरत असून, हा चमत्कार म्हणजे श्रींची कृपादृष्टीच आहे असे जाणवते. यामुळे पायी दिंडीनेही भक्तांच्या रांगाच्या - रांगा आजूबाजूच्या परिसरातून मोठ्या संख्येने येत असतात.असे चिरनेर महागणपती श्रीक्षेत्र हे अनेक भक्तांचे श्रद्धास्थान बनले असून, महागणपतीच्या पद स्पर्शाने पावन झालेल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी २५ सप्टेंबर १९३० च्या गौरवशाली व शौर्यशाली चिरनेर जंगसत्याग्रहामध्ये आठ शूर विरांनी हौतात्म्य पत्करलेल्या हुतात्म्यांच्या पुण्य चिरनेर भूमित गणेश भक्तांचा जनसागर ओसांडत आहे.

**-जीवन केणी, उरण**

# ...म्हणून माघी गणेश जयंती करतात साजरी

या वर्षी शनिवारी (दि.१४) माघ शुक्ल चतुर्थी असल्याने या दिवशी श्रीगणेश जयंती, विनायक चतुर्थी, तिलकुंद चतुर्थी आणि वरद चतुर्थी आहे. गणपतीचे एकूण तीन अवतार मानले गेले आहेत. या तीन अवतारांचे तीन जन्मदिवस आपण साजरे करीत असतो. पहिला अवतार वैशाख पौर्णिमेच्या दिवशी 'पुष्टिपती विनायक जयंती' म्हणून आपण साजरा करीत असतो. दुसरा अवतार भाद्रपद शुक्ल चतुर्थीला 'श्रीगणेश चतुर्थी' म्हणून पार्थिव गणेश पूजन करून आपण साजरा करीत असतो. तिसरा अवतार हा माघ शुक्ल चतुर्थीला 'गणेश जयंती' म्हणून आपण साजरा करीत असतो.



माघ महिन्यातील पूजावयाची मूर्ती ही मातीची किंवा धातूचीही चालते तसेच भाद्रपद महिन्यातील गणेशचतुर्थीला जशी घरोघरी मातीची गणेशमूर्तीची पूजा केली जाते तशी माघातील गणेशजयंतीला प्रत्येक घरी पूजा केली जात नाही. तशी परंपरा किंवा प्रथाही नाही. गणेशमूर्तीची नेमकी किती दिवस पूजा करून मूर्तीचे विसर्जन करावयाचे तेही कोणत्याही मान्यवर धर्मशास्त्रग्रंथात सांगितलेले नाही. काही ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव साजरे केले जातात. काही कुटुंबात गणेशजयंतीला परंपरेप्रमाणे व्रत केले जाते. गणेश जयंतीच्या दिवशी नक्तव्रत आचरून ढुंढिराजाचे पूजन करावे आणि तिळसाखरेचे किंवा तिळगुळाचे मोदक अर्पण करावेत असे सांगण्यात आले आहे. दिवसभर उपवास करून सूर्यास्तानंतर भोजन करण्याचीही प्रथा आहे. गणेशाने नरांतक राक्षसाचा वध करण्यासाठी कश्यपाच्या कुटुंबात विनायक या नावाने अवतार घेतला म्हणून ही विनायकी चतुर्थी जास्त प्रसिद्ध आहे. या चतुर्थीला तिलकुंद चतुर्थी म्हणतात. षोडशोपचार गणेशपूजन करून तिळमिश्रित गुळाच्या लाडवाचा नैवेद्य अर्पण करतात. कुंदफुलांनी गणेशाची आणि सदाशिवाची पूजा करून रात्री जागरण करतात म्हणून या चतुर्थीला 'तिलकुंद चतुर्थी' असेही म्हणतात. या तिथीला स्नान, दान,जप व होम कर्म केल्यास गणेशकृपा राहते अशीही उपासकांची श्रद्धा असते.

माघ महिन्यातील या गणेश जयंतीच्या दिवशी करावयाचे गणेशपूजन भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थीच्या गणेशपूजनासारखेच असते. या दिवसात शेतात धान्य तयार होत असते, म्हणून पृथ्वीविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ती एकप्रकारे पृथ्वीचीच पूजा असते. म्हणून मातीच्याच गणेशमूर्तीचे पूजन करावयाचे असते. **-दा. कृ. सोमण**

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# Pixeledमध्ये काय खास? तरुणाईने घेतले डोक्यावर

इन्टाग्राम हे एक लोकप्रिय फोटो-व्हिडिओ शेअरिंग ॲप आहे. या पची तरूणांमध्ये मोठी क्रेझ आहे. तर आता इन्स्टाला टक्कर देण्यासाठी बाजारात नवीन ॲप आले आहे. हे प अगदी इन्स्टाग्रामसारखं आहे. नवीन ॲप हे युझर्सच्या अधिक पसंतीला पडत आहे. त्यातील सुविधांमुळे ते लोकप्रिय होत असल्याचे सांगण्यात येत आहे. या दोघांपैकी कोणत्या पमध्ये जास्त फीचर्स, टूल्स आणि प्रायव्हेसी कंट्रोल आहे, ते समजून घेऊयात



### Pixelfedची इन्स्टाग्रामला टफ फाईट

पिक्सेलफेड अशा नेटवर्कवर काम करते, ज्यामुळे युझर्सला डेटा आणि कंटेंटवर जास्त नियंत्रण मिळते. या पमध्ये युझर्स फोटो शेअर करू शकतो. दुसऱ्याला फॉलो करू शकतो. याशिवाय विविध लोकांशी चॅटपण करता येते. हा प्लॅटफॉर्म फोडाईवर्ससोबत कनेक्ट आहे. हे ॲप मॅस्टोडॉन सारख्या इतर एक्टिविटीपब-बेस्ड नेटवर्कवर काम करते.

इतर Social Media प्लॅटफॉर्मप्रमाणेच पिक्सेलफेडवर युझर्स डेटा मध्यवर्ती सर्व्हरवर जतन केल्या जात नाही. त्यामाध्यमातून अनेक युझर्स एकाचवेळी अनेकांशी संवाद साधू शकतात. हे ॲप दिसायलासुद्धा इन्स्टाग्रामसारखे आहे. त्याचा इंटरफेस पण इस्टासारखाच आहे.

### इन्स्टाग्रामला पिक्सेलफेडची टक्कर

मेटाच्या कंटेंट मॉडरेशनच्या घोषणेनंतर नवीन प बाजारात दाखल करण्यात आले आहे. पिक्सेलफेड याच आठवड्यात लाँच करण्यात आले आहे. अनेक युझर्सने दावा केला आहे की, त्यांनी या नवीन ॲपची लिंक फेसबुकवर शेअर केली, पण आता मेटाने ही लिंक ब्लॉक केली आहे.


Engadgetनुसार मेटाने चुकीने पिक्सेलफेड लिंक ब्लॉक केली. आता युझर्सने या ॲपची लिंक शेअर केल्यावर ती ॲक्टिव दिसत आहे. पिक्सेलफेडचे सीईओ आणि संचाल डॅनियल सुपरनॉल्ट यांनी गेल्या ऑक्टोबरमध्ये TikTokला पर्यायी लूप्स हे ॲप सुरू केले होते.

TikTokवर अमेरिकेत अनेक निर्बंध येत आहेत. तर काही जणांनी भारताप्रमाणे टिकटॉक अमेरिकेत बंद करण्याची भूमिका जाहीर केली आहे. मेटाच्या कंटेंट मॉडरेशनमुळे वैतागलेल्या युजर्सला नवीन पिक्सेलफेड आणि लूप्स हे दोन चांगले पर्याय मिळाले असल्याचा दावा करण्यात येत आहे.

# ज्येष्ठ समीक्षक म.द. हातकणंगलेकर

मधुकर दत्तात्रेय हातकणंगलेकर हे मराठी समीक्षक होते. त्यांचा जन्म १ फेब्रुवारी १९२७ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण हातकणंगलेत झाले. वडिलांच्या अकाली निधनामुळे ते मामाकडे सांगलीत आले आणि सांगलीकर होऊन गेले.

हातकणंगलेकर १९४४मध्ये मॅट्रिक झाले आणि सन १९४६मध्ये त्यांनी विलिंग्डन कॉलेजात असताना इंटर आर्ट्सच्या परीक्षेत तर्कशास्त्र या विषयासाठीचे प्रसिद्ध असे सेल्बी पारितोषिक मिळविले. नंतर १९४८मध्ये बीए परीक्षेत इंग्रजी विषयासाठी त्यांना मुंबई विद्यापीठात एलिस पारितोषिक मिळाले. १९५०मध्ये त्यांनी पुणे विद्यापीठातून इंग्रजी आणि मराठी विषयात एमए पूर्ण केले. यानंतर त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या विलिंग्डन महाविद्यालय सांगली येथे अर्धव्याख्याता म्हणून अध्यापन कारकिर्दीला सुरुवात केली. पुढे धारवाड येथे ॲग्रिकल्चरल महाविद्यालयात ते पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून नोकरीस लागले. १९५६मध्ये ते विलिंग्डनमध्ये परतले आणि तिथेच ते प्राध्यापकापासून ते प्राचार्य असे सलग १९८७पर्यंत काम करीत राहिले. मराठीतील अक्षरवाङ्मय इंग्रजीत अनुवादित करून त्यांनी मराठीचे स्थान देश आणि जागतिक स्तरावर उंचावण्याचे काम केले.



## निमित्त

महाराष्ट्राबाहेरच्या भारताला आणि जागतिक साहित्यविश्वाला मराठीतील कसदार लेखन पोहचवण्याची त्यांची कामगिरी मोलाची ठरली. हातकणंगलेकर हे वास्तविक इंग्रजीचे प्राध्यापक, पण त्यांचा मराठी साहित्याचा व्यासंग खूप दांडगा होता. त्यातूनच त्यांनी ललित लेखनाला प्रारंभ केला आणि पुढे जाऊन ते समीक्षात्मक लेखन करू लागले. तत्कालीन सत्यकथा, समाजप्रबोधन पत्रिका, नवभारत, वसंत, वीणा, महाद्वार अशा नियतकालिकांतून त्यांचे लेखन चांगलेच गाजले.

पुढे त्यांनी अनेक इंग्रजी कथांचे मराठीत लेखन केले, तर गो.नी.दांडेकर यांची 'माचीवरचा बुधा' आणि व्यंकटेश माडगूळकर यांची 'सती' या कांदबर्यांचे इंग्रजीत अनुवाद केले. त्यांनी त्यांचे 'उघडझाप हे आत्मवृत्त वाचकांच्यासमोर आणले.

पाश्चात्त्य वाङ्मय व समीक्षा यांच्या चौफेर व्यासंगातून त्यांची समीक्षा डोळस, संयत व व्यापक झाली आहे. त्यांनी सौंदर्यशास्त्रीय तसेच तात्त्विक, सैद्धांतिक स्वरूपाचे काही समीक्षालेखन केले असले, तरी त्यांची ख्याती मुख्यत्वे स्वागतशील वृत्तीचे आस्वादक समीक्षक म्हणून आहे. आस्वादक समीक्षेचा मानदंड त्यांनी मराठीत निर्माण केला. समकालीन साहित्यातील नवनवे प्रवाह, नव्या पिढीतील गुणवान प्रतिभावंत लेखक व त्यांच्या महत्त्वपूर्ण साहित्यकृती यांविषयी त्यांनी आत्मीयतेने व गुणग्राहक वृत्तीने सातत्याने लिहिले आहे. त्यांची समीक्षा जशी स्वागतशील व आस्वादक आहे, तशीच ती सूक्ष्म, सखोल चिकित्सक व विश्लेषणात्मक स्वरूपाची आणि साक्षेपी व समतोल वृत्तीची निदर्शकही आहे. त्यांना अनेक मानसन्मान लाभले.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, साहित्य अकादेमी समिती, ज्ञानपीठ मराठी समिती इ. अनेक संस्थांचे सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले. अशा या श्रेष्ठ समीक्षकाचे २५ जानेवारी २०१५ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात






## आरोग्य प्रहर

# मधुमेहींनी आहारात 'या' पदार्थांचे सेवन करावे

हिवाळ्यात तुमच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. हिवाळ्यात मधुमेहाच्या रूग्णांनी त्यांची विशेष काळजी घेतली पाहिजेल. हिवाळ्यामध्ये मधुमेहाच्या रूग्णांच्या रक्तातील साखरेची पातळी वाढते ज्यामुळे त्यांना त्रास होऊ शकतो. अशा परिस्थितीमध्ये मधुमेहाच्या रूग्णांनी त्यांच्या आहाराकडे लक्ष द्यावे. हिवाळ्यात शरीर निरोगी ठेवणे हेच एक मोठे आव्हान असते. हिवाळ्यात जास्त प्रमाणात शारिरीक हालचाल होत नाही ज्यामुळे जेवल्यावर तुमच्या रक्तातील साखरेची पातळी वाढते. थंडीमध्ये भरपूर भूक लागते ज्यामुळे तुमचं वजनदेखील वाढते.



जास्त प्रमाणात पदार्थांचे सेवन केल्यास तुमच्या रक्तातील साखरेची पातळी वाढते. योग्य व्यायाम आणि पोषक आहाराचा समावेश केल्यास तुमचं आरोग्य निरोगी राहाण्यास मदत होते. निरोगी आरोग्यासाठी तुमच्या आहारामध्ये फायबर, प्रोटिन, हेल्दी फॅट्स, कार्बोहायड्रेट्स अशा पोषक घटकांचा समावेश केला पाहिजेल. मधुमेहाच्या रुग्णांनी फक्त ताजे आणि घरी बनवलेले जावन खावे. त्यासोबतच त्यांच्या जेवणामध्ये जास्त प्रमाणात तेलाचा वपर करू नये. तसेच तळलेले आणि प्रक्रिया केलेले पदार्थ टाळावेत. मधुमेहाच्या रूग्णांनी त्यांची काळजी नेमकं कशा पद्धतीनं घ्यावी चला जाणून घेऊया.

हिवाळ्यात रक्तातील साखरेची पातळी वाढण्याचा धोका जास्त असतो. अशा परिस्थितीत लोकांनी काही गोष्टींची विशेष काळजी घेतली पाहिजे. मधुमेहाच्या रूग्णांनी त्यांच्या आहारात साखरेचं प्रमाण नियंत्रित ठेवायला हव. जास्त प्रमाणात फायबरचे सेवन केल्यास आरोग्य निरोगी राहाते त्यासोबतच तुमचं वजन देखील नियंत्रित राहाण्यास मदत होते. फायबरचे ससेवन तुम्ही ओट्स, नाचणी अशा आरोग्यदायी पदार्थांनी करू शकता. फायबरचे तुमच्या आहारामध्ये नियमित सेवन केल्यामुळे तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहाते, तुमचं वजन नियंत्रित राहाते आणि पचन सुधारण्यास मदत होते. मधुमेहाचा त्रास असलेल्या लोकांनी हिरव्या भाज्यांचे सेवन करावे. गाजर, मुळा, पालक, मेथी, ब्रोकोली सारख्या पोषक भाज्यांचा तुमच्या आहारात समावेश करावा. मधुमेहाच्या रूग्णांनी त्यांच्या आहारात डाळी, अंडी, मासे, चिकन आणि चीज यांसारख्या प्रथिनयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करावा.

याशिवाय लोकांनी त्या ऋतूमधील फळेही खावीत. फळांमध्ये पोषक घटक आणि अँटिऑक्सिडंट्सने असतात ज्यामुळे तुमचं आरोग्य निरोगी राहाण्यास मदत होते.

# पेण बँक ठेवीदारांच्या हक्कासाठी सर्वोच्च प्रयत्न करणार -मंत्री बाबासाहेब पाटील

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना त्यांचे बुडालेले पैसे परत मिळावेत यासाठी सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे आश्वासन राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिले. या संदर्भात राज्याचे रोजगार हमीमंत्री भरत गोगावले यांच्या पुढाकाराने सहकारमंत्री यांच्यासोबत बैठक लावली. कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी बैठक लावण्यासाठी प्रयत्न केले होते.

पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांचे प्रश्नावर राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील आणि राज्याचे रोजगार हमीमंत्री भरत गोगावले यांच्यासोबत पेण अर्बन बँक संघर्ष समिती यांच्या पदाधिकारी यांची बैठक कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या मागणीनुसार झाली. सहकार भवनात झालेल्या या बैठकीत आमदार थोरवे यांनी बँकेच्या ठेवीदारांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या न्यायासाठी आम्ही सातत्याने संघर्ष करीत आहोत आणि हा प्रश्न तातडीने मार्गी लागण्यासाठी राज्य सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून त्याला आणखी गती मिळायला हवी, अशी मागणी सहकार भवन येथील बैठकीत केली.

पेण अर्बन सहकारी बँकेच्या ठेवीदारांच्या प्रलंबित प्रश्नांवर तातडीने तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि रोजगार हमी मंत्री नामदार भरत गोगावले यांच्या समवेत आमदार महेंद्र थोरवे यांनी संघर्ष समिती यांच्या सोबत झालेल्या बैठकीत प्रामुख्याने ठेवीदारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सविस्तर चर्चा झाली.राज्य सरकार पेण बँकेच्या ठेवीदारांच्या बाजूने असून राज्याच्या सहकार विभागाकडून ठेवीदारांच्या न्यायासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जाईल असे स्पष्ट करण्यात आले. यासाठी आवश्यक त्या प्रक्रियांची माहिती घेऊन लवकर योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही या वेळी देण्यात आली.

या बैठकीस सहकार आयुक्त दीपक तावरे, अप्पर निबंधक कोथिंबीर, खोपोलीचे माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, संघर्ष समितीचे अध्यक्ष शिरीष भिवरे, सदस्य अनिल बोभाटे, संतोष चौधरी, रवींद्र दणे, प्रदीप शहा, मोहन सुर्वे उपस्थित होते. या बैठकीमुळे ठेवीदारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.




## अलिबाग नगरपरिषद
### आरोग्य विभाग
### निविदा सुचना सन २०२४-२५

अलिबाग नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील निविदा सुचनेमध्ये अलिबाग नगरपालिका स्वच्छ भारत अभियान २.० व माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत कामे करणेकामी साहित्य पुरवठा करणेबाबत निविदा मागविण्यात येतआहेत. सविस्तर निविदासुचना दिनांक ०३/०२/२०२५ पासून अलिबाग नगरपरिषद आरोग्य विभागात उपलब्ध आहेत. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल / सुधारणा असल्यास प्रसिध्द करणेत येईल.

जा.क्र. ३०१
दिनांक : ३१/०१/२०२५

सही/-
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद

## निविदा सूचना

सिद्धिविनायक को ऑप हौ. सोसायटी लि. प्लॉट नं. ०३,सेक्टर नं. १४,खांदा कॉलनी, नवीन पनवेल, ४१०२०६ को ऑप हौसिंग सोसायटी कडून अनुभवी व मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून सोसायटी इमारत दुरुस्ती व रंगरंगोटी साठी निविदा १०/०२/२०२५ च्या आत मागविण्यात येत आहेत. उपरोक्त निविदा अर्ज सोसायटी कार्यालयातून रक्कम रुपये १०००/-ला दि. ०२/०२/२०२५पासून उपलब्ध राहतील. (अंदाजे किंमत ५० लाख ) सदर निविदा काहीही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे चे सर्व अधिकार सोसायटी स्वतःकडे राखून ठेवत आहे.
**संपर्क : ९०२२७८७५७६/९९८७०७१७७७**

सही/- सेक्रेटरी
सही/- चेअरमन

सिद्धिविनायक को ऑप हौ. सोसायटी लि.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी **श्रीमती. नजरीना बेगम मुजीब कुरेशी** यांचे मालकीच्या खालील वर्णनाच्या रहीवासी सदनीका खरेदी करण्याचे ठरवीलेले आहे. सदरहू रहीवासी सदनीकेचे वर्णन खालीलप्रमाणे: -

– मिळकतीचे वर्णन –

**मौजे- तळोजा पंचनंद, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०९,** येथील पनवेल महानगरपालीकेच्या हद्दीतील **सेक्टर १४ मधील प्लॉट क. ९६** वर बांधण्यात आलेल्या **ऑरा रोझ को.ऑप. हौ.सो.** मधील तिसऱ्या मजल्यावरील रहीवासी **सदनीका क.३०४,** ज्याचे बिल्टअप क्षेत्रफळ ३९२ चौ. फुट आहे व रहीवासी **सदनीका क. ३०५,** ज्याचे बिल्टअप क्षेत्रफळ ३९० चौ. फुट आहे अशा वर्णनाच्या मिळकती तिच्या सोबतच्या तदअनुशंगीक शेअर सर्टीफीकेट इत्यादी सर्व लाभांसह.

तरी सदरहू वर नमुद मिळकतीबद्दल कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काहीही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोश व बोजाविरहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदरहू मिळकतींचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**दि. ३१/०१/२०२५**
**स्थान-नवी मुंबई**

**सही/-**
**ॲड. नवीन वि. धोंगडी**
**डी-४०१, ग्रिनस्केप रॉयल को. ऑप. हौ.सो., प्लॉट नं. २५, सेक्टर ७, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९.**
**मो.क्र . ९००४०८७८७३**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल मे**सर्स. साहिल असोशिएटस् बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, तर्फे भागीदार १) श्री. अशोक एम. जयधारा २) श्री. साहिल अशोक जयधारा** यांनी **१) पुष्पावती घनश्याम कोळी, २) किशोर घनश्याम कोळी, ३) प्रतिभा घनश्याम कोळी, ४) रत्नप्रभा घनश्याम कोळी, ५) विलास घनश्याम कोळी, रा. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड** यांचे भाडेपट्टा मालकी हक्काचा खालील वर्णनाचा भुखंड त्यांचेकडुन कायमस्वरूपी त्रिपक्षीय भाडेपट्टा कराराने आणि इतर अनुशंगिक दस्तऐवजाने आपले लाभात कायमस्वरूपी भाडेपट्टा मालकी हक्काने हस्तांतरीत करून घेण्याचे योजले आहे.

**भुखंडाचे वर्णन**
**नोड-उलवे, तालुका-पनवेल, जिल्हा रायगड**

| भुखंड क्रमांक | सेक्टर क्रमांक | क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|
| २६ | ८ | ९९.५६ चौ.मी. |

वर नमूद भुखंडास अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसांचे आत** आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर १५ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद भुखंडाचे हस्तांतरण त्रिपक्षीय भाडेपट्टा करार आणि इतर अनुशंगिक दस्तऐवजाद्वारे कायदेशिरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

**दिनांक ३१/०१/२०२५**
**ठिकाण : पनवेल**

**सही/-**
**शरद रामचंद्र जाधव,**
**वकील**
**(बी.कॉम. एलएल.बी.)**

नोंदणी क्र. एम् ए एच-३५८६/२००८ कार्यालयीन पत्ता: कार्यालय क्र. ००१, तळमजला, रॉयल प्राईड, भुखंड क्र. ११३, एम.सी.सी.एच. सोसायटी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

खाली सविस्तर नमूद केलेल्या मौजे-पारगाव डुंगी, ता. पनवेल, जि. रायगड येथील शेतीच्या मिळकतीचे बदल्यात २२.५% योजनेअंतर्गत मिळणारा भूखंड आमचे अशिलांनी सदरहू भूखंडाचे मालक श्रीम. मंजुळा कृष्णा नाईक, श्री. बाळाराम कृष्णा नाईक, श्री. भरत कृष्णा नाईक, श्री. पद्माकर कृष्णा नाईक, श्री. अनिल उर्फ अण्णा कृष्णा नाईक, श्रीम. हिराबाई राम नाईक, श्री. पंकज राम नाईक, श्री अजय राम नाईक यांचेकडून मे. सिडको महामंडळाच्या पूर्वपरवानगीने त्रिपक्षीय करारान्वये खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मौजे-पुष्पक नगर, ता. पनवेल, जि. रायगड**

| नोड | प्लॉट नं. | सेक्टर नं. | क्षेत्र चौ. मी. |
|---|---|---|---|
| मौजे-पुष्पक नगर | २०७ | ३ | २०० चौ.मी. |

वरील भुखंडाच्या मिळकतीवर कोणाचा, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, एम.ओ.यू., साठेकरार, वचन चिठ्ठी, बयाणा पावती, विकास करार, विक्री-करार, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लिन, पोटगी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ (चौदा)** दिवसांचे आंत योग्य त्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास सदरहू भुखंडाची मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशील सदर भूखंडच्या मिळकतीचे खरेदी-विक्रीच्या अनुषंगाने हस्तारणाचा त्रिपक्षीय करार व अन्य व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक -०१/०२/२०२५**

**सही/-**
**ॲड. श्री. स्वप्नेश संजय घरत**
**ऑफिस : ००१, पहिला मजला, ए-विंग, यशोकिरण को. ऑप, हौ. सोसायटी, सावरकर चौक, पनवेल-४१०२०६**
**ता. पनवेल, जि. रायगड.**
**मोबाईल क्र.८३६९४९४३४१/९६९९०३६४३२**

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर


### सावंतवाडी ते दिवा पॅसेंजरमध्ये दागिन्यांची चोरी

**पनवेल :** खेड रेल्वे स्टेशन ते गोरेगाव रेल्वे स्टेशनदरम्यान सावंतवाडी ते दिवा पॅसेंजर ट्रेनमध्ये माणगाव येथील महिला पतीसोबत पॅसेंजर ट्रेनमधुन खेड ते दिवा असा प्रवास करीत असताना दोन लाख रुपये किमतीच्या सोन्याच्या बांगड्या चोरण्यात आल्या. याबाबत गोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.


## E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tender -41 **(RFX.7000035069)** | RFx e-tender for Supply of various type of Earthrod/Discharge, hand gloves and safety helmets at various substation under EHV (O&M) Division Panvel. **(Tender Fee Rs.** 500/- + **18% GST)** | **Rs.9,89,805/-** |
| Tender -42 **(RFX.7000035089)** | RFx e-tender for work of carrying out the earhing Audit (Health Assessment) of existing mat at 220kV Apta , 100kV Thal & Bhokarpada substation under EHV (O&M) Division Panvel. (Tender Fee Rs. 500/- + 18% GST) | **Rs.14,86,800/-** |

EMD 1% of estimated cost for each Tender. **Submission of bids from 31.01.2025 to 14.02.2025 up to 14:59 hrs, Opening date:-14.02.2025 @ 15:00 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The ADDL. Executive Engineer (O) Tel No. 022-27465410, Mob. No. 8530095666 E-mail ID ee7210@mahatransco.in

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER, EHV(O&M) DN PANVEL**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी **श्री. रमेश वेंकटराव कौरू** यांचे मालकीची खालील वर्णनाची रहीवासी सदनीका खरेदी करण्याचे ठरवीलेले आहे. सदरहू रहीवासी सदनीकेचे वर्णन खालीलप्रमाणे:-

– मिळकतीचे वर्णन –

**मौजे कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०९,** येथील पनवेल महानगरपालीकेच्या हद्दीतील **सेक्टर ३६ मधील प्लॉट क. ३४** वर बांधण्यात आलेल्या **कृष्णा बिल्डींग, जय गणेशजी को.ऑप. हौ. सो.** मधील 'सी' विंग मधील, तिसऱ्या मजल्यावरील रहीवासी सदनीका क.३०१, ज्याचे कार्पेट क्षेत्रफळ २८.८९ चौ.मी. आहे अशा वर्णनाची मिळकत तिच्या सोबतच्या तदअनुशंगीक शेअर सर्टीफीकेट इत्यादी सर्व लाभांसह.

तरी सदरहू वर नमुद मिळकतीबद्दल कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काहीही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोश व बोजाविरहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचे व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**दि. ३१/०१/२०२५**
**स्थान-नवी मुंबई**

**सही/-**
**ॲड. नवीन वि. धोंगडी**
**डी-४०१, ग्रिनस्केप रॉयल को. ऑप. हौ.सो., प्लॉट नं. २५, सेक्टर ७, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९.**
**मो.क्र . ९००४०८७८७३**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी **श्री. अभिजीत रघुनाथ राऊळ व श्रीमती. अनिता अभिजीत राऊळ** यांचे मालकीची खालील वर्णनाची रहीवासी सदनीका खरेदी करण्याचे ठरवीलेले आहे. सदरहू रहीवासी सदनीकेचे वर्णन खालीलप्रमाणे:-

– मिळकतीचे वर्णन –

**मौजे- कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०९,** येथील पनवेल महानगरपालीकेच्या हद्दीतील **सेक्टर ३६ मधील प्लॉट क. ३४** वर बांधण्यात आलेल्या **कृष्णा बिल्डींग, जय गणेशजी को.ऑप. हौ.सो.** मधील 'एफ' विंग मधील, चौथा मजल्यावरील रहीवासी सदनीका क. ४०४, ज्याचे कार्पेट क्षेत्रफळ २१.७४ चौ.मी. आहे अशा वर्णनाची मिळकत तिच्या सोबतच्या तदअनुशंगीक शेअर सर्टीफीकेट इत्यादी सर्व लाभांसह.

तरी सदरहू वर नमुद मिळकतीबद्दल कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काहीही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोश व बोजाविरहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचे व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**दि. ३१/०१/२०२५**
**स्थान-नवी मुंबई**

**सही/-**
**ॲड. नवीन वि. धोंगडी**
**डी-४०१, ग्रिनस्केप रॉयल को. ऑप. हौ.सो., प्लॉट नं. २५, सेक्टर ७, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९.**
**मो.क्र . ९००४०८७८७३**

## डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
## ता. दापोली, जिल्हा रत्नागिरी.

Web site: www.dbskkv.org, Email - registrar@dbskkv.ac.in

जा.क्र. डॉ. बासाकोकृवि/आस्था-ब/जाहिरात/प्रकल्पग्रस्त/क ड/ ४३../२०२५, दिनांक :- २९.०१.२०२५

### जाहिरात

डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली करिता ज्या प्रकल्पग्रस्तांनी प्रत्यक्षात जमिनी दिलेल्या आहेत अशा प्रकल्पग्रस्तांकरिता या विद्यापीठांतर्गत विविध कार्यालयांमधील शिक्षकेतर पर्वांसाठी (गट-क व गट-ड मधील रिक्त पदांकरिता) जाहिरातीमध्ये दिलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या ईच्छुक उमेदवारांकडून ऑफलाईन पध्दतीने दिनांक २८.०२.२०२५ पर्यंत अर्ज मागविणेत येत आहेत, सदर पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | संवर्ग | वेतनश्रेणी | एकूण पदे |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ संशोधन सहाय्यक | (एम-१३, ३५४००-११२४००) | १ |
| २ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | (एस-१३, ३५४००-११२४००) | ४ |
| ३ | वरिष्ठ लिपीक | (एम-८, २५५००-८११००) | ३ (२+१ संभाव्य) |
| ४ | लिपीक | (एम--६, १९९००-६३२००) | ६ |
| ५ | कृषि सहाय्यक | (एस-८, २५५००-८११००) | १३ |
| ६ | वीजतंत्री | (एस-८, २५५००-८११००) | १ |
| ७ | वरिष्ठ प्रयोगशाळा सहाय्यक | (एस-१०, २९२००-९२३००) पदवीधर<br>(एस-८, २५५००-८११००) इतर | १ |
| ८ | प्रयोगशाळा सहाय्यक (मत्स्य) | (एस-७, २१७००-६९१००) | १ |
| ९ | प्रयोगशाळा सहाय्यक (कृ.अ.त.म.) | (एस-८, २५५००-८११००) | १ |
| १० | प्रयोगशाळा सहाय्यक (पी.एच.एम.) | (एस-८, २५५००-८११००) | १ |
| ११ | यंत्रचालक बोट | (एस-८, २५५००-८११००) | १ |
| १२ | तांडेल | (एस-८, २५५००-८११००) | १ |
| १३ | कर्षित्रचालक | (एस-७, २१७००-६९१००) | २ |
| १४ | वाहनचालक | (एस-६, १९९००-६३२००) | ६ |
| १५ | कुशल मासेमार | (एस-७, २१७००-६९१००) | १ |
| १६ | मासेमार | (एस-७, २१७००-६९१००) | १ |
| १७ | बोटमन / डेकहॅन्ड | (एस-६, १९९००-६३२००) | १ |
| १८ | शिपाई | (एस-१, १५०००-४७६००) | ३६ (३४ + २ संभाव्य) |
| १९ | माळी | (एम-५, १८०००-५६९००) | ५ |
| २० | पहारेकरी | (एस-१, १५०००-४७६००) | १० |
| २१ | स्वच्छक | (एस-१, १५०००-४७६००) | २ |
| २२ | मदतनीस | (एस-१, १५०००-४७६००) | १ |
| २३ | मंजूर | (एस-१, १५०००-४७६००) | १५० (१४२ + ८ सभाव्य) |
| | एकूण | | २४९ |

वरीलप्रमाणे भरावयाच्या विविध संवर्गातील सर्व पदांचा सविस्तर तपशील व अर्ज नमुना http://www.dbskkv.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच जाहिरातीबाबत संपूर्ण तपशिल या विद्यापीठाच्या नोटीसबोर्डवर आणि विद्यापीठ अधिनस्त सर्व कार्यालयांमध्येही उपलब्ध आहे.

**सही/-**
**कुलसचिव,**
**डॉ.बा.सा.को.कृ.वि., दापोली**

## रोहा अष्टमी नगर परिषद
### ता. रोहा, जि.रायगड पिन कोड नं. ४०२१०९

फोन नं. कार्यालय - ०२१९४/२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४/२३४०७८ email :rohanagarpalika@gmail.com

क्र. रोनप/आरोग्य/ज.हि.या-१५५/२०११/१५३७/२०२४-२५ दिनांक ३१/०१/२०२५

### जाहीर सूचना

रोहा शहरातील सर्व नागरिक, राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते यांना कळविण्यात येते कि, मा. उच्च न्यायालयाचे दिनांक ३१ जानेवारी २०१७ चे आदेशान्वये रोहा अष्टमी नगर परिषद कार्यक्षेत्रामध्ये अनधिकृत जाहिराती यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. सदर कारवाईचा भाग म्हणून रोहा अष्टमी शहरात अधिकृत बॅनर, फ्लेक्स, पोस्टर्स इ. प्रकारच्या तात्पुरत्या जाहिराती लावणेसाठी खालीलप्रमाणे जागा निश्चित करण्यात आलेल्या असून बॅनर, फ्लेक्स, पोस्टर्स इ. लावणेसाठी जाहिरातीच्या आकारमानानुसार पूर्व परवानगी (ना हरकत दाखला) शुल्क निर्धारित करण्यात आलेले आहे.

| जाहिराती लावणेसाठी निश्चित करण्यात आल्या जागा | | नोडल अधिकारी यांचा तपशील | तक्रारीसाठी संपर्क |
|---|---|---|---|
| १) श्री राम मारुती चौक<br>२) तीन बत्ती नाका<br>३) जिजामाता चौक, दमखाडी<br>४) फिरोज टॉकीज समोर | ५) दगडी शाळा पूर्वेकडील भिंत<br>६) ब्लड बँके समोर<br>७) नगर परिषद कार्यालय समोर<br>८) आझाद चौक, अष्टमी | नोडल अधिकाऱ्यांचे नाव- श्रीमती. अस्मिता अनिल देशमुख, (नगररचना सहाय्यक) सहाय्यक नोडल अधिकाऱ्यांचे नाव श्री. मनोज प्र. पुलेकर (स्वच्छता निरीक्षक) | फोन नं. ०२१९४-२३५७३७, टोल फ्री क्र.- १८००५९९२४०० वेबसाईट- https://mahaulb.in ईमेल- rohanagarpalika@gmail.com SMS & WhatsApp मो.क्र. ८४४६१५२११२ |

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या नागरिक सुविधा केंद्रातून उपरोक्त नमूद ठिकाणी जाहिराती लावण्यास Integrated Web Based Portal (IWBP) द्वारे QR कोडसह परवानगी देण्यात येत असून सदर ठिकाणांव्यतिरिक्त जाहिरात धारकाकडून शहरात अन्यन्त्र तसेच QR कोड नसलेली जाहिरात लावल्यास अनाधिकृत ठरविण्यात येईल व नगर परिषद प्रशासनाद्वारे महाराष्ट्र मालमतेच्या विरुपणास प्रतिबंध अधिनियम, १९९५ नुसार दंडात्मक कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात येतील तसेच निष्कासनास येणारा खर्च देखील वसूल करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तरी रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील सर्व नागरिक, राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी शहरात अनाधिकृत फ्लेक्स, बॅनर, जाहिराती, होर्डींग्स उभारू नयेत, जाहिरात धारकांनी रीतसर परवानगी घेऊनच QR कोडसह होर्डिंग, बॅनर, फ्लेक्स, पोस्टर्स इ. लावावेत/ प्रसिद्ध करावेत. QR कोड विरहित माहिती फलक लावल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ वरील नमूद संपर्क क्रमांकावर अथवा SMS व Whatsapp क्रमांकावर अथवा ई-मेलद्वारे अथवा वेबसाईट अथवा प्रत्यक्ष, या कार्यालयास कळवावे व मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करण्यास प्रशासनास सहकार्य करावे.

**सही/-**
**(अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. ६३/२०२४-२०२५ (मुंबई) करीता**

दिनांक १६/०१/२०२५ रोजी दैनिक मुंबई चौफेर, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचेनांव | अंदाजितरक्कम |
|---|---|---|
| १. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील जुनी व नवीन पाणिपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. पाताळगंगा एक वर्षाच्या कालावधीसाठी शुद्ध आणि अशुद्ध जलउदंचन केंद्रातील मोटर्सची वार्षिक तत्वावर सर्व्हिसिंग आणि रिवाइंडिंग करणे. | ₹ २७,८८,२४१.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १०/०२/२०२५ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## निवडक

### ड्रेनेज लाईनची सफाई

**पनवेल :** शिवसेनेच्या पाठपुराव्याने पनवेल शहरातील



आझादनगर रेल्वे स्टेशन रोड पनवेलजवळील सार्वजनिक शौचालयाच्या ड्रेनेज लाईनची सफाई करण्यात आली आहे. शिवसेना पनवेल शहर मार्फत आज आझादनगर रेल्वे स्टेशन रोड पनवेलजवळची सार्वजनिक शौचालयची ड्रेनेज लाईन भरून घाण पाणी बाहेर निघत होते व घाण वास येत होता. त्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना घाण वासाचा त्रास सहन करावा लागत होता. याबाबत शिवसेना पनवेल शहर प्रसिद्धीप्रमुख तोफिक बागवान यांना येथील नागरिकांना ही माहिती दिली असता त्यांनी त्वरित संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून ड्रेनेज लाईन साफ करून तेथील नागरिकांना दिलासा दिला आहे.

### वामनाश्रम स्वामी दर्शन सोहळा



**पनवेल :** वैश्य समाज बांधव पनवेल तालुका यांच्या वतीने काशी तथा हळदीपूर मठाधिपती वैश्य गुरु श्री श्री वामनाश्रम महास्वामी यांचे आशीर्वचन आणि दर्शन सोहळा खारघर सेक्टर ३४, क्रिश सेलेस्टिया बिल्डिंग येथील योगेश तांबोळी यांच्या निवासस्थानी करण्यात आले होते. या वेळी अनेकांनी वैश्य गुरु वामनाश्रम महास्वामींचे आशीर्वचन आणि दर्शन घेतले. सोमवारी संत जनाबाई भजन मंडळ नेरे यांच्या भजनाचे आयोजन खारघर येथे करण्यात आले होते. त्यानंतर स्वामींचे आशीर्वचन आणि दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होता.

### आवरे विद्या संकुलात कविसंमेलन

**चिरनेर :** आवरे येथील ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे शैक्षणिक संकुलात साहित्याचा वारसा जोपासण्यासाठी बुधवारी (दि.२९) कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वतीने कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. दरम्यान, निवृत्त प्राचार्य ए. डी. पाटील, प्रा. एल. बी. पाटील, कवी मच्छिंद्र म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे, अजय शिवकर, न.ग. पाटील लवेश मोकल, विलास काटे, निवास गावंड तसेच अन्य कवींनी कवी संमेलनात सहभाग घेत, विविध विषयांवरील स्वरचित कविता सादर केल्या. माही भोसले, विद्या म्हामणकर, गौरी थळी व निर्जल ठाकूर या विद्यार्थ्यांनी कविता सादर केल्या. प्राचार्य सुभाष ठाकूर यांनी कवींचे स्वागत केले. सूत्रसंचालन विलास काटे, तर आभार रोहिणी गोरे यांनी मानले.



# कळंबोलीत कचरा प्रदुषणाचा धोका

## दक्षता घेण्याबाबत रविनाथ पाटील यांचे आयुक्तांना पत्र

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीत स्थलांतरण केंद्रातूने प्रदूषण न होण्याची दक्षता घेण्याची मागणी कळंबोलीतील रविनाथ पाटील सामाजिक चारिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष तथा भाजपचे शहराध्यक्ष रविनाथ पाटील यांनी एका पत्रानुसार पनवेल महापालिकेकडे केली आहे.

कळंबोली येथे कामोठे, नौपाडा, रोडपाली, ओवे, खारघर येथील जमा केलेला सर्व कचरा स्थलांतरण करण्यासाठी कळंबोलीतील भूखंडाची निवड करण्यात आली आहे. कळंबोलीमध्ये जमा केल्या जाणाऱ्या कचरा संकलन करून मग स्थलांतरण केंद्रातून डम्पिंग ग्राउंडवर त्याची विल्हेवाट लावली जाणार आहे.

कळंबोलीतील रोडपाली गावाजवळील तलावालगत असलेल्या मल:निसारण केंद्रातील मोठा भूखंड हा कचरा स्थलांतरण केंद्रासाठी पनवेल महापालिकेने निश्चित केलेला आहे. १४८५ चौरस मीटर च्या भूखंडावर तब्बल १४ कोटी २४ लाख रुपये खर्च करून कचरा स्थलांतरण केंद्र निर्माण केले जाणार आहे. या स्थलांतरण केंद्रामध्ये दररोज दोनशे टन कचराचे स्थलांतरण करून त्याची विल्हेवाट लावण्यासाठी तळोजा येथे पाठवला जाणार आहे. या कचरा स्थलांतरण केंद्राच्या आजूबाजूस गृहनिर्माण संस्था असून नागरी वस्ती ही आहे. दररोज साठणाऱ्या कचऱ्यातून सुटणारी दुर्गंधी त्यातून होणारे प्रदूषण याची दक्षता घेण्याची मागणी आता नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

रविनाथ पाटील सामाजिक चॅरिटेबल ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी कचऱ्यातून कोणतेही प्रदूषण व नागरी वस्तीला हानिकारक, असे आरोग्याशी निगडित प्रश्न निर्माण होऊ नये याबाबतची दक्षता व काळजी घेण्याची मागणी पत्राद्वारे केली आहे.

# बांधकाम व्यावसायिकावर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

खरेदी केलेल्या रूमचे बांधकाम व्यावसायिकाने रजिस्ट्रेशन करून न देता त्या रूममध्ये दुसराच व्यक्ती राहत असल्याचे माहित झाल्यानंतर बांधकाम व्यावसायिक कल्पेश ज्ञानेश्वर कोनकर (रा. चक्की नाका, कल्याण) याच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

शब्बीर हजारी दिन हे कल्याण, चक्की नाका येथे राहत असून त्यांनी कीमया बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांच्या चिंचवली तर्फे वाजे या ठिकाणी चाळीच्या प्रोजेक्टमध्ये २०२० मध्ये रूम नंबर एक बुक करून खरेदी केला. त्यासाठी कल्पेश कोनकर यांना साडेचार लाख रुपये चेक आणि रोख स्वरूपात दिले. रजिस्ट्रेशन करून देण्याबाबत विनंती केली असता नंतर बघू असे सांगून कोनकर यांनी टाळाटाळ केली आणि रजिस्ट्रेशन करून दिले नाही. शब्बीर हे कल्याण येथे राहत असल्याने रूम मधील पेंटिंग आणि दरवाजाचे काम करून त्यांनी लॉक लावले होते. मे २०२४ मध्ये रूमवर गेले असता त्या रूममध्ये एक व्यक्ती अतिक्रमण करून राहत होता आणि त्यावेळी हा रूम मी खरेदी केला आहे असे त्यांनी सांगितले.

या प्रकाराबाबत बांधकाम व्यवसायिक कल्पेश कोनकर यांना विचारणा केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. याप्रकरणी बांधकाम व्यावसायिक कल्पेश कोनकर यांच्या विरोधात २५ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

# फेरीवाल्यांवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाड्यात अनधिकृत फेरीवाल्यांचा प्रश्न ऐरणीवर पोहचला आहे. सानपाडा फेरीवाल्यांबाबत पालिकेकडे तक्रार करण्यात आली होती. याबाबत वृत्त प्रसारित केले होते. त्याची दखल पालिकेने घेत फेरीवाल्यांवर कारवाई सुरू केली आहे.

सानपाड्यात उघड्यावर खाद्यपदार्थ विक्रीचा व्यवसाय करणाऱ्यांवर महापालिकेकडून कारवाईला सुरुवात करण्यात आलेली आहे. सानपाड्यातील रहिवाशांच्या आरोग्याशी खेळण्याचे काम हे उघड्यावर खाद्यपदार्थ विकणारे लोक दररोज करत आहेत. विशेष म्हणजे या खाद्यपदार्थ विक्रेत्यांमध्ये परप्रांतीय लोंढ्यांचा अधिक समावेश असून यांच्यामुळे सानपाडा विभागात गुन्हेगारीच्या घटना दिवसेंदिवस वाढतच चालल्या आहेत. सानपाडा



विभागातील रहिवाशांना दमदाटी करून दादागिरी करण्याचे धाडस आता हे फेरीवाले करू लागले आहेत. याविरोधात अनेकांनी आवाज उठवून पालिकेला कारवाई करण्यासाठी पत्र दिले होते.

आम्ही नेहमीच या फेरीवाल्यांच्या विरोधात सुरवातीपासून आवाज उठवत आहोत, मात्र आता सानपाडा विभागातील प्रत्येक रहिवाशाने या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला पाहिजे, असे योगेश शामराव शेटे यांनी सांगितले.

# कर्नाळा अभयारण्यात प्राण्यांचे आकर्षक पुतळे

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्याचा कायापालट होत आहे. विशेष म्हणजे हा कायापालट होत असताना निसर्ग संपदा मोठ्या प्रमाणात नष्ट होत आहे, मात्र पनवेलमध्येच कर्नाळा अभयारण्य आज तालूक्यात निसर्गाच्या सानिध्यात निसर्गप्रेमी पर्यटकांना खुणावणारे हक्काचे ठिकाण बनले आहे. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी या ठिकाणी नवी झळाळी देत बच्चेकंपनीसाठी याठिकाणी वाघ, हरीण, फ्लेमिंगो तसेच फुलपाखरूचे पुतळे उभारण्यात आले आहेत.

कर्नाळा अभयारण्यात वेगवेगळ्या पक्षांच्या प्रजातीचा अधिवास आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या संख्येने पक्षप्रेमी येतात. तसेच निरव शांतता, मुंबई गोवा महामार्गावर उंचावर असलेले हे थंड ठिकाण आहे. २०२४ मध्ये वर्षभरात ७५ हजारांपेक्षा जास्त पर्यटकांनी याठिकाणी हजेरी



लावत. ट्रेकिंग,पक्षी निरीक्षण तसेच अभयारण्यातील शांततेची अनुभूती घेतली. १३४ प्रजातीचे देशी विदेशी पक्षी तसेच बिबटे, रान डुक्कर, रानमांजर आदींसह विविध शेकडो प्रजातीच्या प्राण्यांचा याठिकाणी अधिवास आहे. याव्यतिरिक्त कर्नाळा किल्ल्याला मोठा इतिहास आहे.

१२४८ साली कर्नाळा किल्ला बांधण्यात आला. देवगिरीच्या यादवाचा सुरूवातीला त्याच्यावर अमल होता. त्यानंतर मुघलांनी हा किल्ला सर केल्याचे इतिहास काही प्रमाणात दाखले देतोय. १५८२ दरम्यान या ठिकाणी निजामशाही होती, मात्र वसईच्या कॅप्टनने ३०० युरोपियन सैन्याचा वेढा टाकून ही प्राचीन वास्तु काबीज केली. पोर्तुगिजाने १७५० पौंडाचा बदल्यात तो पुन्हा निजमाला बहाल केला.

या किल्ल्यांचे अनान्य साधारण असे महत्व लक्षात घेता मुघलांनी काही काळ राज्य केले. १६७० छत्रपती शिवाजी महाराजांनी कर्नाळा किल्ला जिंकून त्याचा स्वराज्यात समावेश करून घेतला. असा या किल्ल्याचा गौरवशाली ईतिहास आहे.त्यामुळे निसर्गाचे सानिध्य आणि ऐतिहासीक महत्व पाहता मुंबई उपनगर तसेच राज्यभरातील पर्यटक याठिकाणी हजेरी लावत आहे.

पर्यटकांचा याठिकाणी येणारा कळ पाहता पर्यटकांसाठी या ठिकाणी नवी साज देण्यात आली आहे. याठिकाणी ओपन जिम, बसण्यासाठी बाकडे,लहान मुलांच्या मनोरंजनासाठी अनेक करमणुकीची साधने बसविण्यात आली आहेत.

> **मागील वर्षी ७५ हजारांपेक्षा जास्त पर्यटक या ठिकाणी आले होते. कर्नाळा अभयारण्य परिसरात आणखी नवे बदल करण्यात येणार आहेत. पक्षीनिरीक्षक, ट्रेकर्ससाठी आम्ही गाईड्सदेखील उपलब्ध करून देतो.**
> **–नारायण राठोड, वनक्षेत्रपाल, कर्नाळा अभयारण्य**

# पनवेल पंचायत समितीमध्ये कुष्ठरोग शोधमोहीम समन्वय समितीची सभा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंचायत समिती पनवेल येथे सोमवारी (दि.२७) कुष्ठरोग शोध मोहीम २०२५ ची तालुकास्तरीय समन्वय समितीची सभा गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

या वेळी तालुक्यातील तीन लाख ३१ हजार ४९० लोकांची, ६६ हजार २९८ घरांना भेटी देऊन तपासणी करण्यात येणार आहे. त्याची प्रसिद्धी गाव पातळीवर होण्यासाठी शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायतीच्या दर्शनी भागावर बॅनर लावून प्रसिद्धी करण्याचे ठरवले आहे. तसेच शाळांमध्ये प्रार्थनाच्या वेळेस कुष्ठरोगाची जनजागृती करण्याचे ठरवले आहे. या सभेत सिताराम मोहिते गटशिक्षणाधिकारी, प्रवीण पाटील एकात्मिक बालविकास प्रकल्पाधिकारी, उदय ठकार व अशोक आंबेकर स्थानिक स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी, शरद बडे, राजेंद्र वानखडे, ज्ञानेश्वर खोळगडे आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. तसेच समितीचे सचिव डॉ. अपर्णा खेडेकर तालुका आरोग्य अधिकारी यांच्या उपस्थितीत सभा घेण्यात आली.



**पनवेल : देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी ३० जानेवारी रोजी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार गुरुवारी पनवेल महापालिका मुख्यालयासमोरील प्रवेशद्वाराजवळ महापालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दोन मिनिटे मौन पाळून हुतात्म्यांना आदरांजली वाहिली.**

# म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनकडून आयुक्त मंगेश चितळे यांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेतील सफाई कामगारांच्या वारसांना वारसाहक्काने एका आठवड्यात नोकरीमध्ये सामावून घेतल्याबद्दल आयुक्त मंगेश चितळे यांचा म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत युनियनचे अध्यक्ष अ‍ॅड. सुरेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सत्कार करण्यात आला.

या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक नितीन पाटील, डॉ. अरुणशेठ भगत, युनियनचे कार्याध्यक्ष संतोष पवार, सरचिटणीस अनिल जाधव, कोषाध्यक्ष दत्तगुरू म्हात्रे, विश्राम म्हात्रे, किरण मोहिते, वैभव



पाटील आणि कामगार उपस्थित होते.

राज्यातील सफाई कामगारांच्या वारसांना उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठातील निर्णयानुसार तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील शासन निर्णयानुसार सहा आठवड्यात नोकरी देण्यासंदर्भात सुस्पष्ट आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्याप्रमाणे गेले काही वर्षे प्रलंबित असलेल्या वारसांना जलदगतीने नोकरीत सामावून घेतले जाईल हे अपेक्षित होते. यानुसार काही तुरळक ठिकाणी कार्यवाही सुरू झाली आहे. या आदेशाचे पालन अतिशय जलद गतीने करीत पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी सफाई कामगारांच्या वारसांचे नुकसान टाळले आहे. याबद्दल आयुक्तांचा सत्कार करण्यात आला.

आयुक्तांनी सफाई कामगारांच्या कामाचे महत्त्व जाणून जी संवेदनशीलता दाखवली त्याबद्दल हा यथोचित सत्कार म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनच्या माध्यमातून करण्यात आला. त्यांचे अनुकरण खऱ्या अर्थाने राज्यातील सर्व महापालिकेच्या आयुक्तांनी व नगर परिषदा, नगरपंचायत मुख्याधिकाऱ्यांनी करण्याची आवश्यकता आहे, असे मत कामगार नेते संतोष पवार आणि सरचिटणीस अनिल जाधव यांनी व्यक्त करून आयुक्त चितळे यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले.

## क्लिक...क्लिक...!



**पाली : येथील अष्टविनायकापैकी एक असलेल्या बल्लाळेश्वर गणपती क्षेत्री माघी गणेशोत्सवानिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.** (छाया : धम्मशील सावंत)

# मोहोपाडा येथील जनता विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज मराठी माध्यमाचा वार्षिक स्नेहसंमेलन बुधवारी (दि.२९) उत्साहात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामसुधार मंडळाचे अध्यक्ष डॉ.पद्मनाभ गणेश पळनिटकर होते. तर स्नेहसंमेलन प्रमुख चिंतामण अर्जुन ठाकरे होते.

या वेळी प्रास्ताविकातून प्राचार्य सुधाकर उत्तम चव्हाण यांनी शाळेमध्ये वर्षभर चालणाऱ्या विविध उपक्रमांची आणि शाळेच्या प्रगतीची माहिती दिली. या कार्यक्रमांमध्ये इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यात पाश्चात्य नृत्य तसेच



मराठी मराठी कोळी नृत्य तसेच विविध प्रकारचे थीम डान्स सादर करण्यात आले इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मेरा जूता है जपानी या गाण्यास वन्स मोर मिळाला प्रेक्षकांनी या वेळी उस्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

या वेळी अध्यक्षीय भाषणातून बोलताना डॉक्टर पळणीटकर यांनी शाळेची प्रगती उत्तरोत्तर अशीच होत राहो अशा शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष सुदामशेठ मुंढे सचिव तात्यासाहेब म्हसकर. तसेच ग्राम सुधार मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि जनता विद्यालय शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन नंदिनी भोईर यांनी केले तर आभार बाबासाहेब फुंदे यांनी मानले.

# चिरले येथे गणेश जयंती उत्सव

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील चिरले येथील मंगलमूर्ती निवासस्थान येथे उभारण्यात आलेल्या गणेश मंदिरात मंगलमूर्ती प्रतिष्ठानतर्फे १ फेब्रुवारी रोजी माघी गणेश जयंती उत्सव साजरा करण्यात येणार असून, या निमित्ताने विविध धार्मिक व संस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात सकाळी श्रींचा अभिषेक व महापूजा होईल. तदनंतर १०:३० वाजता महिलांचा हरिपाठ होईल.

दुपारी १२.०० वाजता प्रसिद्ध गायिका मनस्वी माळी या श्री गणेश जन्मोत्सवाचा पाळणा गीत व आरती सादर करतील. त्यानंतर १२:३० वाजता गायिका मनस्वी माळी व गायक पारस वर्तक यांच्या भजनातून सुरावटी ऐकावयास मिळणार आहेत. या वेळी पखवाज वादक मृण्मय माळी हे साथसंगत करणार आहेत.



नियोजनाप्रमाणे दुपारी ३:३० वाजता काव्य दरबार उरण शाखेच्या वतीने विविध विषयांवरील कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून, उरण तालुक्यातील कवींनी या कवी संमेलनात सहभागी होण्याचे आवाहन काव्य दरबारचे संस्थापक अध्यक्ष इतिहासचार्य के. एम. मढवी व कार्याध्यक्षा कवयित्री मीनल माळी यांनी केले आहे.

# जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोधमोहीम अभियान

**दोन हजार १०० पथके स्थापन**



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोधमोहीम अभियान शुक्रवार (दि.३१)पासून सुरू करण्यात आली आहे. हे अभियान १४ फेब्रुवारीपर्यंत राबविण्यात येणार आहे. अभियान दरम्यान आशा स्वयंसेविका, स्वंयसेवक घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून संशयित कुष्ठरुग्णांचा शोध घेणार असून रुग्णांवर उपचार करण्यात येणार आहेत.

या मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र पोयनाड येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आला.

कुष्ठरुग्ण शोध अभियान मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील ५ लाख १६ हजार घरांना आशा व आरोग्य कर्मचारी भेट देणार असून २३ लाख लोकसंखेचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यासाठी २ हजार १०० पथके तयार करण्यात आली आहेत. ४०३ पर्यवेक्षकांच्या माध्यमातून मोहिम राबविण्यात येणार आहे. मोहिमेअंतर्गत घरातील सर्व सदस्यांची कुष्ठरोग संदर्भात संपुर्ण शारिरीक तपासणी करण्यात येणार आहे.

या मोहिमेअंतर्गत समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांच्यावर औषधोपचार करण्यात येणार आहेत. नवीन कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडित करून होणारा प्रसार कमी करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

शुक्रवारी या मोहिमेच्या शुभारंभप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे, जिल्हा कुष्ठरोग सहायक संचालक डॉ. प्राची नेहूलकर, जिल्हा कुष्ठरोग अधिकारी डॉ. सचिन संकपाळ, अलिबाग गटविकास अधिकारी दाजी दाईंगडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ प्रियांका साळुंके, डॉ. पद्मश्री आंधाळकर उपस्थित होते.

**कुष्ठरुग्ण शोध मोहिमेतंर्गत आशा स्वयंसेविका, स्वयंसेवक व आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून संशयित कुष्ठरुग्णांचा शोध घेणार आहेत. नागरिकांनी कृष्ठरोग आजारबाबत गैरसमज व भीती न बाळगता घरी येणाऱ्या पथकाला सहकार्य करावे. मोहीम यशस्वीरित्या राबविण्यासाठी योग्य नियोजन करण्यात आले असून एकही बाधित व्यक्ती उपचारविना राहणार नाही याची काळजी घेण्यात येणार आहे.**

**–डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी**

# कर्जतमध्ये सुवर्ण महोत्सवी स्नेहमेळावा

**कर्जत : प्रतिनिधी**

अभिनव ज्ञान मंदिर प्रशाला, कर्जत या शाळेतील जुनी अकरावी १९७५च्या बॅचला पन्नास वर्षे झाल्याच्या निमित्ताने सुवर्ण महोत्सवी स्नेहमेळाव्याचे आयोजन केले होते. या वेळी या वर्ग मित्रांपैकी काही जण शाळा सोडल्यावर म्हणजे तब्बल पन्नास वर्षांनी पहिल्यांदाच शाळेची पायरी चढत होते.

या वर्गमित्रांना शाळेत आल्यावर जुन्या आठवणींना उजाळा देताना अक्षरशः गहिवरून आले. पन्नासाव्या वर्षी पन्नास वर्गमित्रांनी उपस्थिती हा एक योगायोगच म्हणावा लागेल.

जुन्या अकरावीत १९७५ साली असलेल्या वर्गमित्रांच्या सुवर्ण महोत्सवी स्नेहमेळाव्याचे आयोजन मालवाडी रस्त्यावरील रॉयल कॅम्प येथे करण्यात आले होते. या सर्व विद्यार्थ्यांनी सकाळी शाळेचा लोगो असलेले टी शर्ट परिधान करून शाळेला भेट दिली. सर्व जण एकाच गणवेशात असल्याने शाळेतील शिक्षकांना कौतुक वाटले.

संस्थेचे अध्यक्ष गणेश वैद्य यांनी उपस्थित वर्गमित्रांचे स्वागत केले. विजय मोरे उपस्थित होते. वैद्य यांनी माजी विद्यार्थ्यांसमवेत शाळेच्या नवीन इमारतीची पाहणी करून आर्थिक मदतीचे आवाहन केले. त्यानंतर सर्व वर्गमित्र बसने मेळाव्याच्या ठिकाणी आले.

निवृत्त शिक्षिका उषा वैद्य यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून मेळाव्याचे उद्घाटन झाले. बाळू तवळे, हेमंत डोंबे, प्रभाकर खैरनार, सुचिता वांजळे, प्रभाकर खैरनार आदी उपस्थित होते. नुकतेच दिवंगत झालेले वर्गमित्र माजी नगराध्यक्ष धनंजय चाचड आणि वासुदेव बैलमारे तसेच शिक्षक दामोदर शहासने, जनार्दन परांजपे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर वैद्यबाईंचा सन्मानपत्र शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

विजय मांडे यांनी प्रास्ताविकात शाळेच्या प्रगतीचा आलेख सादर करून शतक महोत्सवी सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी तब्बेतीची काळजी घ्यावी, असे आवाहन केले.



# रहेमान फाऊंडेशनतर्फे रक्तदान शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

रेहमान फाउंडेशनने नेरळ ममदापूर येथे रक्तदान शिबीर घेतले. या रक्तदान शिबिरात तब्बल ३७६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. अलीकडच्या काही वर्षातील हे विक्रमी रक्तदान ठरले.

रेहमान फाउंडेशनच्या माध्यमातून नेरळ येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रायगड ब्लड बँक, भावर ब्लड बँक बदलापूर, श्रद्धा ब्लड बँक लोणावळा या ब्लड बँक यांनी रक्त संक्रमण केले. ३७६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबीराला रहेमान फाऊंडेशनचे अध्यक्ष सय्यद नोमानी,नेरळ पोलीस स्टेशनचे उप निरीक्षक



नितीन मंडलिक तसेच आजाद समाज पार्टीचे महाराष्ट्र उपाध्यक्ष ड सुमित साबळे, रहमान फाउंडेशन माजीद शेख, नसीर भाई आदी मान्यवर उपस्थित होते.

फाउंडेशनचे हजरत मौलाना सज्ञाद नोमाणी यांनी या वेळी संवाद साधताना सांगितले की, ज्या दिवशी या देशात संविधान लागू झाले त्याच दिवशी या देशांमध्ये खऱ्या अर्थाने लोकशाही रुजू होण्याची सुरुवात झाली. भारतातील लोकांना स्वातंत्र्याचा आनंद, अधिकारांची जाणीव झाली हे संविधान निर्माण करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्यासोबत २५ मुस्लिम बांधवांनीसुद्धा अथक परिश्रम केले. जगातील सर्वोत्कृष्ट संविधान म्हणून भारतीय संविधान ओळखले जाते. संविधान निर्मात्यांची जी अपेक्षा होती समता, स्वातंत्रता, बंधुता, एकात्मता, धर्मनिरपेक्ष राष्ट्र निर्मिती या देशात व्हावी व संविधान प्रमाणे हा देश चालला पाहिजे आणि १००% संविधानाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यकर्त्यांनी प्रयत्न केला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# शेतीच्या कामातील पुरुषांची मक्तेदारी संपली!

## मळणीच्या खळ्यात महिलांचा प्रवेश

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धनमध्ये शेतकऱ्यांच्या परंपरागत कष्टातील एक नवा अध्याय सुरू झाला आहे. भात मळणीच्या खळ्यात महिलांची उपस्थिती दिसून येते, आणि यामुळे शेतकऱ्यांना मदतीचा एक नवीन मार्ग मिळालाय. पूर्वी पुरुषांची मक्तेदारी असलेल्या या कष्टकारी कामात महिलांनी पाऊल टाकले असून, यामुळे शेतकऱ्यांना एका नव्या सामर्थ्याचा अनुभव मिळत आहे.

वाढलेल्या मजुरीमुळे पुरुषांचा काम करण्याचा वेळ कमी झाला आहे. परिणामी, महिलांनी ही जागा घेतली असून, भात मळणीच्या



कामात त्या मोठ्या प्रमाणात सहभागी होत आहेत. महिलांची मेहनत, त्यांचा आत्मविश्वास आणि शेतकरी वर्गासाठी योगदान यामुळे त्यांचा सन्मान वाढला आहे. सध्या महिला चांगलेच सक्रिय झाल्या असून, ते भाताचे मळणीचे काम पहाटे लवकर सुरू करतात, उडव्या वरील भाताचे भारे बाहेर काढून शेतकऱ्यांना मदत करतात.

चुल आणि मूल याच्या मर्यादित असलेल्या महिलांच्या भूमिका आता इतर क्षेत्रांमध्ये विस्तारल्या आहेत. शासकीय सेवा आणि खाजगी क्षेत्रामध्ये महिलांनी उच्च पदांवर काम करणे देखील सामान्य झाले आहे. मात्र, शेतीसारख्या कष्टाच्या क्षेत्रात महिलांचा प्रवेश हा एक महत्त्वाचा बदल आहे.

यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळतोय, कारण महिला या कामात कमी मजुरीवर काम करत आहेत, जे पुरुषांसाठी परवडत नाही. पुरुषांच्या तुलनेत महिलांचा रोजचा खर्च कमी असल्यामुळे, शेतकऱ्यांना अधिक फायदा होत आहे. त्यामुळे 'हम भी किसीसे कम नहीं' याचा प्रत्यय सर्व स्तरांतून घेतला जात आहे.

शेतीमध्ये महिलांचा प्रवेश केवळ आर्थिक दृष्ट्या नाही, तर सामाजिक बदलाचेही संकेत देतो. त्यांचा काम करण्याचा अंदाज आणि त्यांची मेहनत यामुळे संपूर्ण समुदायात सकारात्मक बदल होत आहे.

महिलांचे हे योगदान एक सशक्त आणि प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे महिलांचा हा प्रगतीचा मार्ग त्यांच्या श्रमांची खरी किंमत समजून सन्मानित केला जात आहे.

# रातवड माध्यमिक विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी शाळेत पिकविला भाजीपाला

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयातील विध्यार्थ्यांनी शाळा उपक्रमांतर्गत भाजीपाला लागवड केली आहे.शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मदतीने शालेय परीसरात भाजीपाला लागवड केली करून चांगले असे भाजीपाला पीक घेतले आहे.

विविध सामाजिक, सांस्कृतिक व ज्ञानरचनावादी शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयातील विध्यार्थ्यांनी शालेय परिसरात भाजीपाला लागवड केली असून सदर लागवडी अंतर्गत कांदा, वांगी, शिराळी, कोथिंबीर, तोंडली, वांगी, मिरची इत्यादी पीक घेतले आहे. गेल्या काही दिवसांपासून हा भाजीपाला तयार झाला आहे.

विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम यांच्या मार्गदर्शनाने विद्यालय परिसरात भाजी लागवड करण्यात आली आहे. सदर रोपांची योग्य ती निगा राखून व वारंवार देखभाल करण्यात आली.तसेच या बागेत तयार होणारा भाजीपाला शाळेतून विक्री केला जात असून शिक्षक व विद्यार्थी ही विकत घेत आहेत.मान्यवरांकडून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

सदर भाजीपाला लागवड यशस्वी करण्यासाठी शिक्षक श्रीकृष्ण गरधे यांनी मेहनत घेतली त्यांना शिपाई प्रदीप लांगी यांनी साहाय्य केले.शाळेत लागवड केलेली भाजी उत्पादन सुरू झाल्याने विध्यार्थी आनंदित झाले असून त्यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे.

**भाजीपाला लावताना यातून विद्यार्थ्यांना शेतीचा अनुभव मिळावा हा हेतू आहे. आता तयार भाजी मिळाल्यानंतर विध्यार्थ्यांचा आनंद वाढला आहे. सदर भाजीपाला शाळेत विक्री केला जातो. पोषण आहारात या भाजीपाल्याचा उपयोग होतो.**

**–श्रीकृष्ण गरधे, उपक्रमशील शिक्षक**



# जीवनदूत पुरस्कार मिळाल्याबद्दल भाजप नेते किशोर म्हात्रे यांचा सत्कार



**नागोठणे : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते भाजप नेते किशोर म्हात्रे हे सन १९९६पासून नागोठणे विभागात मुंबई-गोवा महामार्गावरील निडी ते कोलेटीवाडी ते सुकेळी दरम्यान होत असलेल्या अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सतत धावून जात असतात याची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन किशोर म्हात्रे यांना नुकताच अलिबाग येथे राज्याचे कॅबिनेट मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते जीवनदूत पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

किशोर म्हात्रे यांना मिळालेला जीवनदूत पुरस्कार नागोठणेकरांसाठी अभिमानस्पद असल्यामुळे नागोठणे येथील श्री जोगेश्वरी चालक/मालक संस्थेच्या वतीने संस्थेचे कार्याध्यक्ष किशोरभाई म्हात्रे यांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, म्हात्रे यांचा शासनाच्या वतीने केलेला सत्कार योग्यच असल्याचा कौतुकास्पद उदगार संस्थेचे अध्यक्ष पंकज कामथे यांनी आपल्या मनोगतात काढले

या वेळी संस्थेचे अध्यक्ष पंकज कामथे,सुनील बोरगी, दिनेश दुर्गावले, विक्रम दुर्गावले, दीपक दुर्गावले, किरण देवरे आदी पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

# मोफत मेमोग्राफी व आरोग्य निदान शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा मेडिकल फाउंडेशन, डॉ. जाधव नर्सिंग होम, आणि एम ओ सी कॅन्सर केअर अॅड रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मोफत मेमोग्राफी व आरोग्य निदान शिबिराचे आयोजन सोमवार दि. (२७) रोजी करण्यात आले होते या शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मेमोग्राफी चाचणी करण्यासाठी ३ ते ५ हजार रुपये खर्च येतो. या शिबिरा अंतर्गत तालुक्यातील ३० महिलाची मोफत चाचणी करण्यात आली.

या शिबिरामध्ये स्तनाच्या कॅन्सर आणि इतर महत्त्वाच्या आरोग्य तपासण्या ही पूर्णतः मोफत करण्यात आल्या.रोहा तालुक्यातील देवदूत व रायगड भूषण पुरस्कार प्राप्त प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. अशोक जाधव यांनी महिलांना आरोग्य विषयक मार्गदर्शन करताना त्यांनी हृदय आणि स्तनाच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी, योग्य आहार आणि जीवनशैलीतील सकारात्मक बदल यांचा आरोग्यावर होणारा परिणाम, तसेच नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन डॉ. जाधव यांनी केले.

शिबिराच्या आयोजनामध्ये डॉ.जाधव नर्सिंग होमच्या संपूर्ण स्टाफचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या समर्पित सेवेमुळे महिलांना योग्य आणि वेळेवर तपासणी व उपचार मिळाले शिबिरात मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग घेतला आणि या संधीचा लाभ घेतला. भविष्यात अशा प्रकारच्या शिबिरांचे सातत्याने आयोजन करण्याचा संकल्प आयोजकांकडून व्यक्त करण्यात आला आहे.




# चांभारगणीत शेतकऱ्याकडून वनराई बंधाऱ्याच्या पाण्यावर शेतमळा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

ऑक्टोबर महिन्यानंतर पोलादपूर तालुक्यात पाण्याचा तुटवड्याच्या समस्येवर मात करण्यासाठी चांभारगणी खुर्द येथील दीपक शेलार व गावातील शेतकऱ्यांनी लोकसहभागातून वनराई बंधारा बांधला. या बंधाऱ्याच्या पाण्यावर शेतकऱ्यांनी हरभरा, भाजीपाला व इतर कडधान्याचे पाच एकर क्षेत्र सिंचनाखाली आणले आहे.

कृषी विभाग पोलादपूर यांच्याकडून अन्न व पोषण सुरक्षा योजनेतून बंधाऱ्यात अडविलेल्या पाण्यावर भात पड क्षेत्रामध्ये कडधान्य कार्यक्रमांतर्गत हरभरा लागवड करण्यात आली. या लागवडीस तसेच तालुक्यातील चांभारगणी खुर्द, कापडे बुद्रुक, कापडे खुर्द, वाकण, नानेघोळ या गावांमध्ये उपविभागीय कृषी अधिकारी वैभव खटकाळे यांनी प्रक्षेत्र भेट देउन समाधान व्यक्त केले.

कापडे बुद्रुक येथील प्रगतशील शेतकरी रामदास सकपाळ यांच्या हळद लागवड क्षेत्राची पाहणी केली व उपविभागीय कृषी अधिकारी वैभव खटकाळे यांनी सकपाळ यांचे कौतुक केले. या वेळी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग (पीएमएफई) योजनेंतर्गत हळदप्रक्रिया विषयी माहिती देण्यात आली व शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याबाबत आवाहन केले.

कापडे येथील विनोद धनावडे व राजाराम कदम यांच्या ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत आंबा लागवड क्षेत्रास भेट दिली तसेच हरभरा व मसूर प्रक्षेत्राची पाहणी केली. त्यानंतर नानेघोळ येथील तरुण शेतकरी अमर कदम यांचे ड्रॅगनफ्रुट लागवडीची पाहणी केली. अमर हे तरुण शेतकऱ्यांसाठी प्रेरणा असल्याच्या भावना व्यक्त केल्या. वाकणचे संतोष सालेकर यांच्या हरभरा, मूग प्रक्षेत्रास भेट दिली. जीवामृत वापरून भाजीपाला व कडधान्य पिकवल्याने अधिकाऱ्यांनी कौतुक केले. तसेच तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांनी कृषि यांत्रिकीकरण योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी केले.

या प्रक्षेत्र भेटीवेळी मंडळ कृषी अधिकारी श्रीरंग मोरे व भरत कदम, कृषी पर्यवेक्षक रवींद्र गुंड व नितीन धायगुडे, कृषी सहाय्यक कोमल कचरे, मिथुन खराडे, कृषी सेवक रणजित भोसले, तंत्र सहाय्यक सुमित भोपळे इत्यादी उपस्थित होते.



# चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी ऑस्ट्रेलियाला धक्का!

## अष्टपैलू मिचेल मार्श संघाबाहेर



**सिडनी : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. पाकिस्तानकडे यजमानपद असलेल्या या स्पर्धेसाठी संघ जाहीर केले असले तरी अनेक संघांना खेळाडूंच्या दुखापतींचा फटका बसत आहे. आता ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे. त्यांचा स्टार खेळाडू दुखापतग्रस्त झाला असून आता तो चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर झाला आहे.

ऑस्ट्रेलिया संघाचा अष्टपैलू खेळाडू मिचेल मार्श चॅम्पियन्स ट्रॉफीतून बाहेर झाला आहे. त्याच्या बदलीची घोषणा अद्याप झालेली नाही, मात्र लवकरच क्रिकेट ऑस्ट्रेलियाला याबाबत मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घ्यावा लागणार आहे. ऑस्ट्रेलियानेही मिचेल मार्श चॅम्पियन्स ट्रॉफी खेळू शकणार नसल्याचे म्हटले आहे.

३३ वर्षीय मिचेल मार्शला पाठीला दुखापत झाली असून त्यामुळे त्याला संघातून वगळण्यात आले आहे. आता तो २०२५च्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचा भाग असणार नाही. मार्श संघाबाहेर पडणे हा संघासाठी मोठा धक्का आहे, कारण तो एक अष्टपैलू खेळाडू असल्याने संघात समतोल राखता येतो. मार्श बॅट आणि बॉल या दोन्ही बाजूंनी संघासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतो, जे संघासाठी महत्त्वाचे ठरते.

### अशी आहे कामगिरी

मार्शने ऑस्ट्रेलियासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये ६५०६ धावा केल्या आहेत, तर तिन्ही फॉरमॅटमध्ये मिळून ४५० विकेट्स घेतल्या आहेत. मार्शने आपल्या देशासाठी ४६ कसोटी, ९३ वनडे आणि ६५ टी-२० सामने खेळले आहेत. तिन्ही फॉरमॅटमध्ये तो आपल्या संघासाठी महत्त्वाचा ठरला आहे. फक्त एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्याने २७९४ धावा केल्या असून ५७ विकेट्सही घेतल्या आहेत.

ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाला ब गटात दक्षिण आफ्रिका, इंग्लंड आणि अफगाणिस्तानसह स्थान मिळाले आहे; तर अ गटात भारत, पाकिस्तान, न्यूझीलंड आणि बांगलादेश यांचा समावेश आहे. ऑस्ट्रेलियाचा पहिला सामना २२ फेब्रुवारीला इंग्लंडशी होणार आहे. दुसरा सामना २५ फेब्रुवारीला दक्षिण आफ्रिकेसह आणि तिसरा सामना २८ फेब्रुवारीला अफगाणिस्तानशी होणार आहे.

सोशल मीडियावर माहिती देताना क्रिकेट ऑस्ट्रेलियाने लिहिले की, मिचेल मार्श पाठीच्या समस्येमुळे आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर पडला आहे. आता त्याच्या जागी ऑस्ट्रेलिया कोणत्या खेळाडूला संघात स्थान देते हे पाहावे लागणार आहे.

# विराट कोहलीच्या पदरी रणजीतही निराशा!

## हिमांशू सांगवानने केले क्लीन बोल्ड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये फॉर्मच्या शोधात असणारा विराट कोहली रणजी ट्रॉफीत आपली लय शोधेल आणि मोठी खेळी खेळेल, अशी सर्वांना अपेक्षा होती, पण विराटच्या पदरी निराशा पडली. रेल्वेकडून खेळणारा वेगवान गोलंदाज हिमांशू सांगवानने विराटला क्लीन बोल्ड केले.

देशांतर्गत क्रिकेटमध्येही विराट कोहलीला निराशेचा सामना करावा लागला आहे. विराट रेल्वेविरुद्ध केवळ १५ चेंडू खेळू शकला, ज्यामध्ये त्याने ६ धावा केल्या. यानंतर वेगवान गोलंदाज हिमांशू सांगवानने त्याला बाद केले. विराटने आधी एकेक धावा घेत दोन धावा केल्या होत्या. त्यानंतर बाद होण्यापूर्वी विराटने एक शानदार चौकार मारत आपल्या पुनरागमनाचा डंका वाजवला, पण पुढच्याच चेंडूवर तो क्लीन बोल्ड झाला.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यात कोहली प्रत्येक डावात ऑफ-साइड चेंडूवर स्लिपमध्ये बाद होत होता, पण या वेळी विराट बोल्ड झाला. खरंतर विराट दशकभरानंतर रणजी ट्रॉफी खेळण्यासाठी आपल्या दिल्ली संघाकडून उतरला होता. त्याची फलंदाजी पाहण्यासाठी अरुण जेटली स्टेडियमवर हजारो चाहते जमले होते.



हिमांशू सांगवानने चेंडू ओव्हर द विकेटवरून ऑफ स्टंपवर टाकला. आतमध्ये येणारा चेंडू खेळण्यासाठी पुढे आलेला विराटच्या बॅटला न लागता चेंडू बॅट आणि पॅडच्या मधून गेला आणि ऑफ स्टंपवर जाऊन आदळला. ऑफ स्टंप कोलांटउड्या घेत हवेत गेला. हिमांशूने मोठ्या जल्लोषात ही विकेट साजरी केली. विराटला बोल्ड झालेले पाहताच संपूर्ण स्टेडियममध्ये भयाण शांतता पसरली. यानंतर अनेक चाहत्यांनी स्टेडियम सोडण्यास सुरुवात केली.

# ट्रायथलॉनमध्ये महाराष्ट्राला विजेतेपद



**हलद्वानी : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या ट्रायथलॉन संघाने अखेरच्या दिवशी ड्यूयोथलॉन प्रकारात एक रौप्य व एक कांस्यपदक जिंकून ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकांचा षटकार मारत सर्वसाधारण विजेपदावर मोहोर उमटवली.

वैयक्तिक ड्यूयोथलॉन (२.५ किलो मिटर धावणे, २० किलो मिटर सायकलिंग व पुन्हा २.५ किलो मिटर धावणे)मध्ये डॉली पाटीलने ५७.५३ मिनिटात शर्यत पूर्ण करून रूपेरी यश मिळविले. या शर्यतीत मानसी मोहितेने ५९.५६ मिनिटात शर्यत पूर्ण करून कांस्यपदकावर मोहोर उमटवली.

ट्रायथलॉनमध्ये महाराष्ट्राने सहा पदके जिंकून सर्वसाधारण विजेतेपदाही गवसणी घातली. उद्घाटनापूर्वी दोन सुवर्णपदके जिंकून महाराष्ट्राच्या ट्रायथलॉन संघाने सारे लक्ष वेधून घेतले होते. स्पर्धेत दोन सुवर्ण, दोन रौप्य व दोन कांस्य अशी एकूण सहा पदके जिंकून स्पर्धेत अजिंक्यपदाचा ठसा उमटविला.

# अफगाणिस्तानचा क्रिकेटपटू शापूर झद्रानची निवृत्ती

**काबूल : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानचा वेगवान गोलंदाज शापूर झद्रानने वयाच्या ३७व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. २००९मध्ये पदार्पण करणाऱ्या शापूरने ४४ एकदिवसीय आणि ३६ टी-२० सामन्यांमध्ये एकूण ८० विकेट्स घेतल्या आहेत. त्याने त्याचा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना २०२०मध्ये खेळला. त्यानंतर त्याने सक्रिय क्रिकेटपासून स्वतःला दूर केले होते.

अफगाणिस्तान क्रिकेटला जागतिक स्तरावर स्थान मिळवून देण्यात शापूरने महत्त्वाची भूमिका बजावली. २०१५च्या एकदिवसीय विश्वचषकात त्याची कामगिरी अत्यंत प्रभावी होती, ज्यात त्याने २६.५०च्या सरासरीने



१० विकेट्स घेतल्या. या दरम्यान त्याने स्टीव्ह स्मिथ, डेव्हिड वॉर्नर, केन विल्यमसन, तिलकरत्ने दिलशान आणि महमुदुल्लाह सारख्या मोठ्या नावाजलेल्या फलंदाजांना बाद केले. या कामगिरीनंतर शापूरला जागतिक दर्जाचा गोलंदाज म्हणून ओळख मिळाली.

शापूरने २०१५मध्ये डच्युनेडिन येथे स्कॉटलंडविरुद्धच्या सामन्यात सर्वात मोठी कामगिरी केली. त्याने अफगाणिस्तानच्या पहिल्या मोठ्या स्पर्धेतील विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. त्या सामन्यात त्याने ३८ धावा देऊन चार विकेट घेतल्या आणि नंतर ११व्या क्रमांकावर फलंदाजी करताना नाबाद १२ धावा केल्या आणि अफगाणिस्तानने तीन चेंडू शिल्लक असताना एका विकेटने विजय मिळवला. अफगाणिस्तान क्रिकेटच्या इतिहासातील हा एक ऐतिहासिक क्षण होता आणि शापूरची कामगिरी नेहमीच लक्षात ठेवली जाईल.

> *माझा प्रवास अफगाण क्रिकेटच्या सर्वात आव्हानात्मक काळात सुरू झाला. मी अडचणींचा सामना केला, मर्यादित संसाधनांसह खेळलो आणि अनेक अडथळ्यांवर मात केली, पण मी कधीही विश्वास गमावला नाही. क्रिकेट चाहते, माझे सहकारी, प्रशिक्षक आणि विशेषतः माझ्या कुटुंबाचे आभार, ज्यांनी मला प्रत्येक अडचणीवर मात करण्यास मदत केली.*
>
> **-शापूर झद्रान**

# चॅम्पियन्स करंडक स्पर्धेचे उद्घाटन तीन दिवस आधीच?

**कराची : वृत्तसंस्था**

आगामी चॅम्पियन्स करंडक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेचा उद्घाटन सोहळा १६ फेब्रुवारी रोजी लाहोरला आयोजित करण्याचा पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) निर्णय घेतला असून आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) याला संमती दिल्याची माहिती आहे.

चॅम्पियन्स करंडकातील सलामीचा सामना यजमान पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यात १९ फेब्रुवारीला कराची येथील नॅशनल स्टेडियममध्ये होणार आहे, मात्र त्याच्या तीन दिवस आधीच उद्घाटन सोहळा आयोजित करण्याचे ठरविण्यात आले आहे. 'पीसीबी'चे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी चॅम्पियन्स करंडकाच्या संपूर्ण कार्यक्रमाला मंजुरी दिल्याचे समजते.

चॅम्पियन्स करंडकात सहभागी होणाऱ्या सर्व आठ संघांच्या कर्णधारांचे एकत्रित छायाचित्र आणि पत्रकार परिषदेची तारीख ठरविताना 'पीसीबी' व 'आयसीसी' यांची बरीच ओढाताण झाली. अखेर त्यांनी १६ फेब्रुवारी ही तारीख निश्चित केली असून उद्घाटन सोहळा लाहोरमध्ये आयोजित करण्याचा त्यांचा मानस असल्याचे समजते. हा सोहळा ऐतिहासिक लाहोर किल्ल्यावरील हुजुरी बाग येथे होणार असून विविध क्रिकेट मंडळांचे अधिकारी, सिनेअभिनेते, दिग्गज खेळाडू आणि सरकारी अधिकारी यांना आमंत्रित केले जाणार आहे.



**पनवेल : भाजप युवा मोर्चा पुरस्कृत कै. दशरथ शेळके स्मृतिचषक व मा. सदस्य सुनील शेळके चषक प्रकाशझोतातील क्रिकेट स्पर्धा चिंचवली आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी गुरुवारी भेट दिली. आयोजकांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, शुभ पाटील, विकास भगत, अमर शेळके आदी.**



**पनवेल : आई गावदेवी क्रिकेट संघ आणि ग्रामस्थ मंडळ केवाळे ठाकूरवाडी आयोजित आमदार चषक क्रिकेट स्पर्धेला भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. आयोजकांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, माजी सरपंच अण्णाशेठ पालकर, योगेश माळी, चिटणीस यतीन पाटील आदी उपस्थित होते.**







**पनवेल : येथील कोळी ब्रदर्स ग्रुपच्या वतीने करंजाडे येथील मैदानात कोळीवाडा प्रीमियर लीगचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. उद्घाटन समारंभाला भाजप ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार, मल्हार नेटवर्क प्रा.लि. चे संचालक स्वप्नील ठाकूर यांच्यासह कोळीवाडा आणि करंजाडेतील मान्यवर उपस्थित होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून जोरदार फटकेबाजी केली.**

# माथेरानमध्ये क्रिकेट स्पर्धा

**माथेरान : प्रतिनिधी**

मुकद्दर क्रिकेट संघाकडून या वर्षीही भव्य ओव्हरआर्म टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन ४ ते ६ फेब्रुवारीदरम्यान करण्यात आले आहे. यंदाचे या स्पर्धेचे सातवे वर्ष आहे.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावलेल्यांना ६ फेब्रुवारी रोजी संघर्षाची साथ या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

जीवेत् शरदः शतम्!

मोरेश्वर पाटील

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक

उमेश भोसकर

# क्रीडा शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका क्षेत्रातून विविध क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे व नवी मुंबईतून अधिकाधिक गुणवंत खेळाडू निर्माण होऊन शहराच्या नावलौकिकात लक्षणीय भर पडावी या दृष्टीने विविध खेळाचे क्रीडा प्रशिक्षण, जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा महापौर चषकांतर्गत विविध खेळांचे क्रीडा स्पर्धा असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

याचाच एक भाग म्हणून महापालिका कार्यक्षेत्रातील रहिवाशी खेळाडूंना शालेय तसेच शासन मान्यताप्राप्त खेळांचे संघटनेव्दारे आयोजित राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये प्राविण्यप्राप्त खेळांडूना अधिकाधिक प्रोत्साहन देण्याकरिता सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने क्रीडा शिष्यवृत्ती लागू करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सन २०२३-२४मधील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

पात्र खेळाडूंनी क्रीडा शिष्यवृत्तीकरिता विहित नमुन्यातील अर्ज व इतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता २० फेब्रुवारीपर्यंत नवी मुंबई महापालिका क्रीडा विभागाकडे सादर करावी, असे जाहीर आवाहन महापालिका क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात येत असून विहित मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

विहित नमुन्यातील अर्ज राजीव गांधी क्रीडा संकुल सीबीडी बेलापूर येथील क्रीडा विभागात तसेच www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर अर्ज उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. नवी मुंबईतील पात्र खेळाडूंनी या योजनेचा जास्तीत जास्त प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com